सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १६ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ३२ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# UAE सोबत भारताचा सर्वात मोठा गॅस करार




वृत्तसंस्था
अबूधाबी :पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यासाठी शुक्रवार, १४ मे रोजी, संयुक्त अरब अमिरातीची (युएई) राजधानी अबू धाबी येथे दाखल झाले. अबू धाबीमध्ये राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी त्यांचे स्वागत केले यानंतर, दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय बैठक झाली, ज्यामध्ये संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रांसह अनेक महत्त्वाचे करार झाले. दोन्ही देशांमध्ये सामरिक संरक्षण भागीदारीसाठी एका आराखडा करारावर सहमती झाली. पंतप्रधान मोदींच्या छोट्या युएई दौऱ्यातून मोठ्या घडामोडी समोर आल्या आहेत. युएई आणि भारतात या दरम्यान LPG आणि सामरिक पेट्रोलियम साठा (ड्झठ) यांसंबंधी करार केले गेले. होर्मुझ सामुद्रधुनीतील नाकेबंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठा ताणआला आणि अशा वेळी आखाती देशासोबतचा या करारामुळे भारताला दिलासा मिळू शकतो. जागतिक तेल वाहतुकीपैकी २० टक्के वाहतूक होर्मुझ सामुद्रधुनीतून होते.देश पेट्रोल आणि डिझेलसह इंधनाच्या आयातीसंदर्भात संकटाचा सामना करत असताना पंतप्रधान मोदींच्या युएई दौऱ्यातील घडामोडी समोर आल्या आहेत. जगातील सर्वात महत्त्वाचा जलमार्ग - होर्मुझ सामुद्रधुनी - इराण आणि अमेरिका यांच्यात संघर्ष सुरू झाल्यापासून ठप्प पडला असून त्यातून होणारी जहाजांची वाहतूक जवळजवळ थांबली आहे.युद्ध सुरू होण्यापूर्वी इतर आशियाई देशांप्रमाणेच भारतही आपल्या आयातीच्या गरजांसाठी या मार्गावर अवलंबून होता, पण या मार्गावर अडथळा निर्माण झाल्यापासून भारत पर्यायी मार्गांचा शोध घेत आहे. परिणामी, पंतप्रधान मोदींचा दौरा भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण गेमचेंजर मानला जात आहे.संयुक्त अरब अमिरात नेहमीच भारताचा विश्र्वासू भागीदार राहिला असून अलीकडच्या होर्मुझ संकटाच्या पार्श्र्वभूमीवर णअए भारतासाठी 'संकटमोचक' म्हणून उदयास आला आहे. मागील वर्षी, २०२५ मध्ये, (युएई) भारतासाठी कच्च्या तेलाचा चौथा सर्वात मोठा स्रोत होता आणि भारताने तेलाच्या गरजेपैकी ११% तेल येथून खरेदी केले होते. (युएई) च्या (युएई) चा सर्वात मोठा खरेदीदार देखील असून युएई हा भारतासाठी ड्झऋ चा सर्वात मोठा स्रोत देखील आहे. त्याचवेळी, भारतीय रिफायनर्सच्या पेट्रोलियम, तेल आणि वंगणांच्या निर्यातीसाठी (युएई) दुसरे सर्वात मोठे ठिकाण असून भारतीय कंपन्यांनी णअए च्या अपस्ट्रीम क्षेत्रात १.२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे.

# अवघ्या ५० मिनिटांत पुणे! मुंबई-हैदराबाद बुलेट ट्रेनचा मार्ग निश्चित,




तभा वृत्तसेवा
मुंबई : मुंबई ते हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. प्रस्तावित हायस्पीड रेल्वे मार्गाचा प्राथमिक आराखडा जवळपास निश्र्चित झाला असून 'रेल्वे टलास'मध्ये या मार्गाचा उल्लेख करण्यात आला आहे. या नव्या मार्गामुळे पंढरपूर आणि सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला मोठी चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
प्राथमिक माहितीनुसार मुंबई-हैदराबाद हायस्पीड रेल्वे पुणे, बारामती, पंढरपूर, सोलापूर, कलबुर्गी आणि विकाराबादमार्गे धावणार आहे. सध्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम सुरू आहे. त्याच हायस्पीड कॉरिडॉरचा विस्तार पुढे पुणे आणि हैदराबादपर्यंत करण्याची योजना आहे. रेल्वेमंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी यापूर्वीच मुंबई ते हैदराबाद बुलेट ट्रेनबाबत संकेत दिले होते. मुंबई ते पुणे प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत होईल, असे त्यांनी म्हटले होते.
या मार्गामुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. मुंबई ते पुणे अवघ्या ४८ ते ५० मिनिटांत पूर्ण होणार आहे. तर मुंबई ते सोलापूर प्रवास दीड तासांत होऊ शकतो. पुणे ते सोलापूर अवघ्या ४५ ते ५५ मिनिटांत पार होईल. तर पुणे ते हैदराबाद अंतर दोन तासांपेक्षा कमी वेळात पूर्ण होण्याची शक्यता आहे.
मुंबई-पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वेमुळे पंढरपूर आणि सोलापूरला मोठा फायदा होणार असल्याचे मानले जात आहे. पंढरपूरच्या धार्मिक पर्यटनाला यामुळे मोठी चालना मिळू शकते. देशभरातून येणाऱ्या भाविकांसाठी प्रवास अधिक जलद आणि सोयीचा होणार आहे. दुसरीकडे सोलापूरच्या औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रालाही याचा फायदा होऊ शकतो.विशेष म्हणजे सोलापूरजवळ स्वतंत्र बुलेट ट्रेन स्टेशन उभारण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्टेशन परिसरात नव्या विकास प्रकल्पांना गती मिळू शकते. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे सोलापूर आणि पंढरपूर हे दोन्ही भाग राज्याच्या विकास नकाशावर अधिक ठळकपणे समोर येण्याची चिन्हे आहेत.

## डॉ. आनंद नाडकर्णी यांचं निधन

मुंबई : ज्येष्ठ मानसोपचार-तज्ज्ञ, लेखक, आयपीएच आणि मुक्तांगणचे विश्र्वस्त डॉ आनंद नाडकर्णी यांचे निधन झाल्याचे दुर्दैवी वृत्त समोर आले आहे. वयाच्या ६८ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. मुंबईतील परळ भागातील खासगी रुग्णालयात उपचार घेताना त्यांची प्राणज्योत मालवली. शुक्रवार १५ मे रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्र्वास घेतला. डॉ नाडकर्णी यांच्या निधनाने त्यांचा मित्र परिवार, चाहतावर्ग यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

## NEET ची पुर्नपरीक्षा आता २१ जून ला होणार

नवी दिल्ली : पेपरफुटीमुळे रद्द झालेल्या छएएढ ची पुर्नपरीक्षा आता २१ जून २०२६ रोजी होणार आहे. याबाबत आज एनटीएकडून घोषणा करण्यात आली आहे. ३ मे रोजी झालेली परीक्षा पेपरफुटीच्या घटनांमुळे नीटची परीक्षा रद्द करण्यात आली होती.

## चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू

नाशिक : पुणे जिल्ह्यातून नाशिकला लग्नासाठी आलेल्या कुटुंबातील चार महिन्यांच्या चिमुरडीचा संशयित 'अस्पिरेशन निमोनिया'मुळे मृत्यू झाला. दूध पिल्यानंतर बाळाची हालचाल बंद झाल्याचे लक्षात येताच तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेनंतर कुटुंबावर शोककळा पसरली असून नाशिकरोड पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

## २६ मे ला मान्सूनचे आगमन

नवी दिल्ली : हवामान विभागाने यंदा नैऋत्य मान्सून केरळमध्ये वेळेआधी दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. २६ मे रोजी मान्सून केरळ किनारपट्टीवर पोहोचू शकतो, मात्र २२ ते ३० मे दरम्यान कधीही आगमन होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती तयार झाली असून, यंदा देशात सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे..

## प्रतिक पंचत्वात विलीन

लखनौ : समाजवादी पक्षाचे संस्थापक मुलायम सिंह यादव यांचे धाकटे पुत्र आणि भाजप नेत्या अपर्णा यादव यांचे पती प्रतीक यादव यांच्यावर भैशाकुंडमधील वैकुंठ धाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचे सासरे, ज्येष्ठ पत्रकार अरविंद बिष्ट यांनी अग्निडाग दिला. यावेळी कुटुंबीय, नातेवाईक आणि समर्थक त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी जमले होते

## कांद्याचे दर कोसळले

अहिल्यानगर : कांदा पिकवूनही हातात काहीच राहत नाही, मग जगायचं कसं? असा आक्रोश करत कांदा उत्पादक शेतकरी शुक्रवारी रस्त्यावर उतरले. कांद्याच्या भावात झालेल्या अभूतपूर्व घसरणीमुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील टाकळी ढोकेश्र्वर येथे जोरदार रास्ता रोको आंदोलन छेडत शासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली

## व्हॅनचा अपघात

मुंबई : राष्ट्रीय महामार्गावर चारोटी उड्डाणपुलावर चांदी वाहून नेणारी व्हॅन उलटली. मुंबईहून गुजरातच्या दिशेने जात असताना घडला अपघात. व्हॅनमध्ये तब्बल ६०० किलो चांदीच्या विटा असून त्यांची किंमत अंदाजे १७ कोटी ६६ लाख इतकी असल्याची माहिती समोर आली आहे.

# थलपतीकडून आश्वासनांची पूर्तता करण्यास सुरुवात; महिलांसह सरकारी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा



वृत्तसंस्था
चेन्नई : निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्र्वासनांची पूर्तता करण्यास तमिळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री विजय यांनी सुरुवात केल्याचे दिसत आहे. तमिळनाडू सरकारचे कर्मचारी व शिक्षकांच्या महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ करण्याचा निर्णय त्यांनी गुरुवारी घोषित केला. यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांचा डीए ५८वरून ६० टक्क्यांवर पोहोचला आहे. १ जानेवारी २०२६ अशा पूर्वलक्षी प्रभावाने ही वाढ अंमलात येणार आहे. डीएवाढीच्या निर्णयामुळे तमिळनाडू सरकारच्या तिजोरीवर १,२३० कोटी रुपयांचा भार पडणार आहे. निवृत्ती वेतनधारक, तसेच कुटुंब निवृत्ती वेतनधारकांनादेखील या डीएवाढीचा लाभ होणार आहे. यासाठी सरकार आवश्यक अतिरिक्त निधी वितरित करेल, असे सरकारने म्हटले आहे..
राज्यातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री विजय यांचे सरकार वचनबद्ध आहे, असे सरकारतर्फे प्रसृत करण्यात आलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.मद्यखरेदी व मद्यसेवनासाठी असणारी किमान २१ वर्षे वयाची अट कठोरपणे पाळण्याचा निर्धारतमिळनाडूसरकारने केला आहे. मद्यखरेदी करणाऱ्यांच्या वयाबाबत शंका वाटल्यास दुकानदारांनी संबंधित खरेदीदाराच्या वयाचा पुरवा तपासावा, असे निर्देश सरकारने दिले आहे.यापूर्वीच्या द्रमुक सरकारनेराज्यातीलमहिलांसाठी सुरू केलेल्या कल्याणकारी योजनेतील मासिक एक हजार रुपयांची रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात लवकरच जमा केली जाईल, असे मुख्यमंत्री विजय यांनी सांगितले.
द्रमुकचे दिवंगत नेते एम. करुणानिधी यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दरमहा एक हजार रुपये जमा केले जातात. या महिन्यात सत्तांतर झाल्याने पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारी नवीन सरकारवर आली आहे. ही योजना बंद केली जाणार नाही, आमचे सरकार सत्तेत आल्यास आम्ही ६० वर्षांखालील महिलांना दरमहा प्रत्येकी अडीच हजार रुपये देऊ, असे आश्र्वासन विजय यांनी प्रचारादरम्यान दिले होते. या योजनेची पुनर्रचना करण्यासाठी सरकारला काही कालावधी हवा आहे.
लवकरच लाभार्थी महिलांच्या खात्यात एक हजार रुपये जमा होतील, असे विजय यांनी स्पष्ट केले. मात्र माजी मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी यावर टीका केली आहे.
लाभार्थी महिलांना दरमहा १५ तारखेला ही रक्कम मिळायला हवी. सरकारला यासाठी वेळ का हवा आहे, हे कळत नाही, असे ते म्हणाले.

# महाराष्ट्रात भारनियमन होणार इतिहासजमा !

तभा वृत्तसेवा
मुंबई : राज्यातील उद्योगांना आणि सर्वसामान्य नागरिकांना अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी राज्य सरकारने ऊर्जा क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. राज्यातील वीज यंत्रणेचा कायापालट करण्यासाठी आणि अपारंपरिक ऊर्जेला मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी मॅजेस्टिक या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीला मंजुरी देण्यात आली आहे. या महाप्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेतले जाणार असून, यामुळे राज्यातील भारनियमन (लोड शेडिंग) येत्या काळात पूर्णपणे इतिहासजमा होणार आहे.
कोविड संकटानंतर राज्याच्या अर्थव्यवस्थेने घेतलेल्या गरुडझेपमुळे महाराष्ट्रात विजेची मागणी वार्षिक ८ ते १० टक्के या विक्रमी दराने वाढली आहे. 'मेक इन महाराष्ट्र' अंतर्गत होणारी औद्योगिक गुंतवणूक, पायाभूत सुविधांचे महाप्रकल्प आणि कृषी क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता अखंडित, परवडणारा आणि विश्र्वासार्ह वीजपुरवठा करणे हे सरकारसमोरील मोठे आव्हान होते. या पार्श्र्वभूमीवर, पारंपरिक स्रोतांवर आधारित वीज निर्मितीऐवजी सौर आणि पवन ऊर्जेसारख्या पर्यावरणपूरक पर्यायांचा मुख्य ग्रीडमध्ये मोठ्या प्रमाणावर समावेश करून संपूर्ण वीज पुरवठा यंत्रणा सक्षम करण्यासाठी मॅजेस्टिक प्रकल्प आखण्यात आला आहे.
या प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवाल केंद्र सरकारच्या अंतिम मंजुरीसाठी पाठवण्यासही मान्यता देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या अखत्यारीतील आर्थिक व्यवहार विभागामार्फत जागतिक बँकेचे हे कर्ज घेतले जाईल. महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तिन्ही राज्य वीज कंपन्या संयुक्तपणे या प्रकल्पाची अंमलबजावणी करणार आहेत.

# दुसऱ्या टप्प्यात जातनिहाय गणना होणार जातीनिहाय जनगणनेचा संभ्रम दूर

तभा वृत्तसेवा
मुंबई :जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील प्रश्र्नावलीत ओबीसींचा कॉलम नसल्याने निर्माण झालेला संभ्रम अखेर दूर करण्यात आला आहे. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जातनिहाय जनगणना करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय गृहराज्य मंत्री नित्यानंद राय यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांना पत्राद्वारे दिली आहे.राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी जातनिहाय जनगणनेबाबत देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र दिले होते. यामध्ये देशभरात सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या प्रक्रियेत 'ओबीसी'च्या स्वतंत्र जनगणनेसह इतर काही महत्त्वाच्या बाबींकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधून त्यांचे पुनरावलोकन आणि आवश्यक सुधारणा करण्यासंदर्भात विविध मागण्या केलेल्या होत्या. या मागण्यांवर केंद्र सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला असून जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यात जातीनिहाय जनगणना केली जाईल, असे स्पष्ट करून केंद्र सरकारने अधिकृत पत्राद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली आहे.जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घर क्रमांक / इमारत क्रमांक, घराचा प्रकार, भिंत, छप्पर आणि जमिनीचे साहित्य,घराची स्थिती, घर स्वतःचे की भाड्याचे,घरात किती खोल्या आहेत, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव व लिंग, पिण्याच्या पाण्याचा स्रोत, वीज सुविधा आहे का, शौचालय आहे का, आंघोळीची सुविधा,स्वयंपाकघर आहे का, एलपीजी / पीएनजी गॅस कनेक्शन, स्वयंपाकासाठी वापरले जाणारे इंधन, इंटरनेट सुविधा,मोबाईल / स्मार्टफोन वापर, टीव्ही, रेडिओ, संगणक, लॅपटॉप आहेत का, वाहनांची माहिती विचारण्यात आली आहे. तर घर यादी प्रश्र्न क्र. १२ मध्ये सामाजिक वर्गीकरणासाठी केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर असे तीनच पर्याय ठेवण्यात आले असून, इतर मागासवर्गीय (ओबीसी) यांच्यासाठी स्वतंत्र रकान्याची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे ओबीसी समाजाची विश्र्वासार्ह व अचूक जनगणना होणार नाही, म्हणून ही त्रुटी दूर करण्यासाठी जनगणनेच्या अर्जामध्ये 'ओबीसी' या स्वतंत्र प्रवर्गाचा स्पष्ट समावेश करण्याची आग्रही मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी ३० मार्च २०२६ रोजी सविस्तर पत्राद्वारे केली होती.केंद्र सरकारने त्यांच्या मागणीची दखल घेऊन सकारात्मक प्रतिसाद देत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

## पुढील वर्षी १५ लाख घरांचे वितरण :फडणवीस

तभा वृत्तसेवा
सातारा : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने प्रधानमंत्री आवास योजनेत विक्रमी कामगिरी केली असून, एका वर्षात तब्बल पाच लाख घरे पूर्ण करून लाभार्थ्यांना चाव्यांचे वितरण करण्यात आले आहे. पुढील वर्षी आणखी १५ लाख घरांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.
सातारा येथील सैनिक स्कूल मैदानावर आयोजित घरकुल वितरण सोहळ्यात ते बोलत होते. केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले , खासदार उदयनराजे भोसले माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर अतुल भोसले कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे कोरेगावचे आमदार महेश शिंदे सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रियाताई शिंदे उपाध्यक्ष राजू भोसले ग्रामविकास विभागाचे अप्पर सचिव चंद्रकांत पुलकुंडवार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# परतूर पंचायत समिती अंतर्गत घरकुल योजनेचा बोजवारा; इंजिनिअरांच्या हलगर्जीपणामुळे लाभार्थी संतप्त

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यातील परतूर पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांचा अक्षरशः बोजवारा उडाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शासनाच्या महत्त्वाकांक्षी घरकुल योजनेंतर्गत गोरगरिबांना पक्के घर मिळावे, त्यांचे जीवनमान उंचवावे या उद्देशाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असताना पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या काही इंजिनिअरांच्या निष्काळजीपणामुळे अनेक लाभार्थ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा आरोप होत आहे.**




तालुक्यातील अनेक गावांमध्ये घरकुलांचे काम अपूर्ण अवस्थेत पडून असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी बांधकामाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तर अनेक लाभार्थ्यांना तांत्रिक मंजुरी, मोजमाप, बिल प्रक्रिया आणि बांधकाम तपासणीसाठी वारंवार पंचायत समितीचे उंबरठे झिजवावे लागत असल्याची चर्चा गावागावांत सुरू आहे.

लाभार्थ्यांचे म्हणणे आहे की, शासनाकडून हप्ते वेळेवर मिळत नसल्याने काम रखडत आहे. त्यातच संबंधित इंजिनिअरांकडून वेळेवर भेट दिली जात नसल्यामुळे घरकुलांचे प्रस्ताव महिनोनमहिने प्रलंबित राहत आहेत. काही लाभार्थ्यांनी तर काम पूर्ण करूनही मोजमापासाठी अनेक वेळा विनंती करावी लागते, मात्र अधिकारी दुर्लक्ष करतात, असा गंभीर आरोप केला आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक घरकुल लाभार्थी आजही अर्धवट बांधकामात राहत असून पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होईल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाच्या योजनांचा लाभ खऱ्या गरजूंना मिळावा यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

दरम्यान, पंचायत समितीतील काही अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून संबंधित इंजिनिअरांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांकडून केली जात आहे.

घरकुल योजना ही गोरगरिबांच्या आयुष्याशी निगडित अत्यंत महत्त्वाची योजना मानली जाते. मात्र परतूर पंचायत समिती अंतर्गत सुरू असलेल्या कारभारामुळे अनेक लाभार्थ्यांचे स्वप्न अधांतरी राहिल्याचे चित्र दिसून येत आहे. आता जिल्हा प्रशासन व वरिष्ठ अधिकारी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधितांवर कारवाई करणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.



**» परतूर पंचायत समिती अंतर्गत घरकुल योजनांमध्ये सुरु असलेल्या अनियमितता, लाभार्थ्यांची होत असलेली गैरसोय व संबंधित इंजिनिअरांच्या हलगर्जीपणामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. गोरगरिबांच्या हक्काच्या घरकुल योजनेचा बोजवारा उडू नये यासाठी विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी लाभार्थी व नागरिकांतून जोर धरत आहे.**

## संक्षिप्त

### छत्रपती संभाजी महाराज यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, मनीषा दांडगे, सुकेशनी पगारे यांच्यासह तुषार निकम, सतीश तायडे, रवी मगरे, संपदा कुलकर्णी, शिल्पा मगरे, प्रशासकीय इमारतीमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करुन छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन केले.

### जनगणना–२०२७ च्या पहिल्या टप्प्यासाठी प्रशासन सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

केंद्र शासनाने जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत देशव्यापी जनगणना–२०२७ जाहीर केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (जनगणना विभाग) यांनी यासंदर्भात परिपत्रक जारी करून जनगणना–२०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घर यादी व घर गणनेच्या क्षेत्रीय कामांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक सूचना दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार, स्वगणनेचा कालावधी दि. १ मे, २०२६ते दि. १५ मे, २०२६ दरम्यान राहणार असून, प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाज दि. १६ मे, २०२६ ते दि. १४ जून, २०२६ या कालावधीत पार पाडले जाणार आहे. या प्रक्रिये दरम्यान नागरिकांच्या घरांची, कुटुंबांची तसेच विविध सामाजिक व मूलभूत माहितीची नोंद केली जाणार आहे.

या कामासाठी प्रशासनाने जनगणना अधिकाऱ्यांची नियुक्ती, सामान्य जनतेची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यासंदर्भातील वैधानिक अधिसूचना प्रसिद्ध केल्याचेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, घर यादी व घर गणने दरम्यान विचारण्यात येणारे ३३ प्रश्न अधिसूचित करण्यात आले आहेत. जनगणनेची प्रक्रिया सुरळीत आणि अचूक पार पडावी यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना फील्ड ट्रेनरमार्फत प्रशिक्षण देण्यात आले असून, प्रशिक्षण साखळीतील अंतिम टप्प्यातील प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षणही पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. जिल्हास्तरावरील प्रशासकीय संरचना मजबूत करण्याबरोबरच प्रत्येक प्रशासकीय घटकात घर यादी गट तयार करण्याचे कामही पूर्णत्वाकडे आले असुन, यामध्ये परिपत्रकात पुढील महत्त्वाच्या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. यात

आवश्यक प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करून २३ एप्रिल ते ८ मे,२०२६ दरम्यान त्यांचे प्रशिक्षण आयोजन करणे. सर्व घरयादी गटांना क्षेत्रीय कामांचे वाटप करून १६ मे, २०२६ पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करणे. आणि १४ जून, २०२६ पर्यंत क्षेत्रीय काम पूर्ण करण्यासाठी काटेकोर नियोजन करणे. घरयादी, घरगणना तसेच स्व–गणनेबाबत व्यापक प्रसिद्धी करून नागरिकांमध्ये जनजागृती करणे. १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या स्व–गणनेसंदर्भातील आवश्यक व्यवस्था करणे. प्रशासनाने क्षेत्रीय कामकाजात डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करण्यावरही भर दिला असून, सर्व संबंधित विभागांनी वेळेत समन्वय साधून काम केल्यास जनगणना प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नसल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. जनगणना–२०२७ ही देशाच्या लोकसंख्येची, सामाजिक रचनेची आणि विकास आराखड्याची महत्त्वपूर्ण आधारभूत माहिती ठरणार असल्याचे जिल्हा प्रशासन, जालना यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# १३ गावांकडून १७३ गाव वॉटर ग्रीडसाठी ९,३८,८६५ केला भरणा

**आ.बबनराव लोणीकर यांच्याकडून सरपंच, ग्रामसेवक व ग्रामस्थांचे कौतुक**

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



१७३ गाव वॉटर ग्रीड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जालना तालुक्यातील गावांनी जबाबदारीची जाणीव ठेवत बिल भरण्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. जालना तालुक्यातील एकूण १३ गावांनी आतापर्यंत ९,३८,८६५ रुपयांचा भरणा करून योजनेप्रती सकारात्मक सहभाग नोंदविला आहे.

१७३ गाव वॉटर ग्रीड योजनेअंतर्गत गावनिहाय बिल भरणा रक्कम पुढीलप्रमाणे– सावरगाव भागडे २५०००, बीबी ४४२८, उमरी १२३००, उमरी तांडा ५९०४, शिवनगर १९९६९, कोळवाडी दरेगाव ५००००, ढगी ३४६४२, सेवली २०००००, बोरगाव आतापर्यंत ११८४००, एरंडवडगाव ३८२२२, राठोडनगर ८००००, काकडा आतापर्यंत ३२५०००, शंभू सावरगाव ३०००० या उल्लेखनीय प्रतिसादाबद्दल आमदार बबनराव लोणीकर यांनी संबंधित गावांतील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांचे विशेष अभिनंदन केले आहे.

यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, १७३ गाव वॉटर ग्रीड योजना ही ग्रामीण भागाच्या पिण्याच्या पाण्यासाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. जालना तालुक्यातील १३ गावांनी पुढाकार घेत तब्बल ९ लाखांहून अधिक रकमेचा भरणा करून आदर्श निर्माण केला आहे. संबंधित सर्व सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामस्थांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. जालना तालुक्यातील ग्रामपंचायतींकडून १७३ गाव वॉटर ग्रीड योजनेसाठी करण्यात आलेला बिल भरणा हा केवळ आर्थिक व्यवहार नसून ग्रामीण पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम आणि अखंडित ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. ग्रामपंचायतींकडून वसूल करण्यात आलेली ही रक्कम वॉटर ग्रीड योजनेच्या विविध प्रलंबित आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. यामध्ये सर्वप्रथम जलसंपदा विभागाकडून वॉटर ग्रीड योजनेसाठी उचलण्यात येणाऱ्या पाण्याबाबतची थकीत देयके अदा करण्यात येणार असून, यामुळे भविष्यात पाणीपुरवठ्यात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही. तसेच योजनेच्या सुरळीत संचालनासाठी दरमहा मोठ्या प्रमाणात येणाऱ्या वीज वापराच्या थकीत बिलाची रक्कमही या निधीतून भरली जाणार आहे. याशिवाय मुख्य जलवाहिन्या, पंपिंग स्टेशन, मोटार, विद्युत उपकरणे, व्हॉल्व्ह, फिल्टर यंत्रणा तसेच इतर तांत्रिक साधनसामग्रीच्या नियमित देखभाल, दुरुस्ती आणि आपत्कालीन तांत्रिक कामांसाठी लागणारा खर्चही याच निधीतून भागविण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी वेळेवर केलेला हा बिल भरणा केवळ देयकांची पूर्तता करण्यापुरता मर्यादित नसून, ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना भविष्यात अखंड, सुरक्षित आणि नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध राहण्यासाठी हा अत्यंत महत्त्वाचा लोकसहभाग असल्याचे मानले जात आहे. तसेच उर्वरित गावांनीही या योजनेत सक्रिय सहभाग नोंदवत बिल भरणा करून गावाच्या विकासात हातभार लावावा, असे आवाहनही आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

# अवैध गुटखा आणि विदेशी दारू जप्त; तिघांविरुद्ध गुन्हे दाखल



**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा पोलिसांकडू न अवैध धंद्यांविरोधात धाडसत्र सुरू करण्यात आले असून, मंठा शहरात दोन ठिकाणी कारवाई करत अवैध गुटखा व विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रतिबंधित गुटखा अवैधरित्या मंठा चौफुलीवरील एका टपरीमध्ये चोरीछुप्या विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आला होता. या प्रकरणी अहमदपूर येथील गौस अहमद कुरेशी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच मंठा–ऊस्वद रोडवरील उमरखेडा येथे विनापरवाना विदेशी दारू बेकायदेशीररित्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे आढळून आले. या कारवाईत ऋषिकेश विष्णू वाघमारे व कृष्णा सुदाम बोराडे यांच्या ताब्यातून ८१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई व रिष्ठ ांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश विधाटे, फौजदार संतोष माळगे तसेच पोलीस कर्मचारी आनंद ढवळे, कानबा हाराळ, सज्जन काकडे, जायभाय, संतोष बनकर आणि आसाराम मदने यांनी केली.

# चित्रपटातून इतिहास अधिक प्रभावीपणे आणि लवकर समजतो–आ.खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीच्या 'शंभू सप्ताह' निमित्त मंगळवार, दि. १२ मे रोजी एक अत्यंत प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत झेप करिअर अकॅडमी व झेप वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना रत्नदीप सिनेमागृहात 'राजा शिवाजी' हा ऐतिहासिक चित्रपट मोफत दाखवण्यात आला. चित्रपटाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा आणि स्वराज्याचा गौरवशाली इतिहास जवळून अनुभवला. या विशेष उपक्रमाचा शुभारंभ आ. अर्जुनराव खोतकर यांच्याहस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अश्विन आंबेकर, भाऊसाहेब घुगे यांच्यासह जन्मोत्सव समितीचे मार्गदर्शक अरविंद देशमुख, अशोक पडूळ, स्वागताध्यक्ष प्रा. राजेंद्र जाधव, अध्यक्ष रामेश्वर ढोबळे आदींची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आ. खोतकर म्हणाले की, केवळ पुस्तकी वाचनापेक्षा दृकश्राव्य माध्यमांतून, म्हणजेच चित्रपटातून इतिहास अधिक प्रभावीपणे आणि लवकर समजतो. जेव्हा विद्यार्थी प्रत्यक्ष पडद्यावर महाराजांचे शौर्य आणि स्वराज्याचा संघर्ष पाहतात, तेव्हा तो काळ त्यांच्या डोळ्यांसमोर जिवंत होतो आणि मनावर कायमचा कोरला जातो. अशा ऐतिहासिक चित्रपटांमुळे शिवरायांचे युद्धकौशल्य आणि त्यांचे महान विचार आत्मसात करणे सोपे जाते, जे पुढील पिढीच्या जडणघडणीसाठी अत्यंत आवश्यक आहे. नगरसेवक अश्विन आंबेकर म्हणाले की, शिवरायांचा इतिहास केवळ वाचण्यासाठी नसून तो जगण्यासाठी आहे. जिजाऊंच्या संस्कारांतून घडलेल्या शिवरायांनी स्त्रियांचा सन्मान आणि स्वराज्याची नीती जपली, तोच वारसा या आपल्या आयुष्यात पुढे न्यावा, हीच या उपक्रमामागची खरी भावना आहे. प्रास्ताविकपर भाषणात स्वागताध्यक्ष राजेंद्र जाधव म्हणाले की, छत्रपती संभाजीराजे जयंतीनिमित्त १४ मे रोजी सकाळी ९.३० वाजता संभाजी उद्यानाजवळील छत्रपती संभाजी स्मारकाजवळ शिवशाहीर अरविंद घोगरे यांचा पोवाड्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

### नवनियुक्त पोलीस अधीक्षक तेजबीर सिंह संधू यांचे भाजपाच्या वतीने भास्करआबा दानवे यांनी केले स्वागत



**तभा वृत्तसेवा**

जालना जिल्ह्याचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांची भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी भेट घेऊन पुष्पगुच्छ देत स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या भेटीदरम्यान जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होऊन नागरिकांना सुरक्षित व भयमुक्त वातावरण मिळेल, तसेच पोलीस प्रशासन व नागरिकांमधील समन्वय अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी श्री. गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी व तालुकाध्यक्ष श्री. संजय डोंगरे उपस्थित होते.

# महापुरुषांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करणार –महापौर वंदना मगरे

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



जालना महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभीकरण करून सौंदर्यकरणात भर घालण्यात येईल, असे प्रतिपादन महापौर वंदना मगरे यांनी केले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीच्या वतीने जालना शहरातील छत्रपती संभाजी राजे स्मारकाजवळ गुरुवारी छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी वंदना मगरे बोलत होत्या.

प्रारंभी महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करण्यात आला. प्रसिद्ध शिवशाहीर अरविंद घोगरे यांनी आपल्या पहाडी आवाजात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास मांडला. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, उपमहापौर राजेश राऊत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, युवा नेते अक्षय गोरंट्याल, उद्योजक घनशामदास गोयल, गणेश सुपारकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी, मनपा आयुक्त अंजली शर्मा, उपायुक्त सुप्रिया चव्हाण, श्रीमती जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, समितीचे मार्गदर्शक अरविंद देशमुख, अशोक पडूळ, स्वागताध्यक्ष प्रा. राजेंद्र जाधव, अध्यक्ष रामेश्वर ढोबळे, सागर पाटील, महेश नागवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी नगरसेवक अक्षय गोरंट्याल म्हणाले की, आगामी काळात जालना महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना 'शिवकालीन शस्त्रविद्या' प्रशिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव मांडला जाणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात अरविंद देशमुख म्हणाले, अनेकांनी छत्रपती संभाजी महाराजांना वेगवेगळ्या नावांनी संबोधले, परंतु, महाराजांना कोणत्याही एका चौकटीत किंवा नावाच्या भिंतीत अडकवणे शक्य नाही. माझ्या मते, ते स्वराज्यरक्षक आणि धर्मवीरही आहेत असे देशमुख म्हणाले. या कार्यक्रमाला किशोर मरकड, माजी नगरसेवक बाबूराव पवार, सुजित जोगस, सुनील साळवे, सुधाकर रत्नपारखे, शिवराज नारियलवाले, संजय देठे, प्रा. राजेंद्र भोसले, कारभारी मसलेकर, पंकज जहऱ्हाड, संदीप ताडगे, वंजारी सेवा संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष देवेंद्र बारगजे, मातंग मुक्ती सेनेचे संस्थापक अशोक साबळे, उद्धव पवार, लक्ष्मण नेव्हाल, कास्ट्राईब संघटनेचे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कृषि विद्यापीठात १८ मे रोजी 'खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शन'
# शेतकऱ्यांसाठी सुधारित बियाणे विक्रीसह आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन

**परभणी ,/प्रतिनिधी:-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५४ व्या वर्धापन दिनानिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार असून, वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल तसेच सार्वजनिक आरोग्य, पाणी पुरवठा, ऊर्जा, महिला व बालकल्याण तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर या प्रमुख उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि राहणार आहेत. कार्यक्रमास राज्यसभा सदस्य खासदार अशोक चव्हाण, डॉ. अजित गोपछडे, रामराव वडकुते, लोकसभा सदस्य खासदार संजय जाधव तसेच आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, डॉ. राहुल पाटील, रत्नाकर गुट्टे, बालाजी कल्याणकर, राजेश विटेकर व श्रीजया चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक डॉ. पंजाब सिंग, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य डॉ. कौशिक बॅनर्जी व डॉ. व्ही. एम. मायंदे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

परिसंवादात खरीप हंगामातील विविध पिकांचे नियोजन, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन तसेच आधुनिक कृषि तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासोबतच कृषि प्रदर्शनामध्ये विविध सुधारित वाण, यंत्रसामग्री व कृषि पूरक उद्योगांचे प्रदर्शन मांडण्यात येणार आहे. कार्यक्रमादरम्यान विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी लिहिलेल्या विविध घडीपत्रिका, पुस्तिका आणि 'शेतीभाती' मासिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमास शेतकरी, कृषि अधिकारी, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दौलत चव्हाण यांनी केले आहे.

### खरीप हंगामासाठी सुधारित बियाण्यांची विक्री...

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठाच्या बीज प्रक्रिया केंद्रामार्फत खरीप हंगाम २०२६ साठी उपलब्ध करण्यात आलेल्या दर्जेदार बियाण्यांच्या विक्रीने होणार आहे. विद्यापीठाने ज्वारी, मूग, तूर, सोयाबीन आणि बाजरी या पिकांच्या सुधारित वाणांचे बियाणे विक्रीस ठेवले आहेत. उपलब्ध वाणांमध्ये ज्वारीचे 'परभणी शक्ती', मूगाचे 'बीएम-२००३-२', तुरीचे 'बीडीएन-७१६' व 'बीडीएन-१३-४१ गोदावरी', सोयाबीनचे 'एमएयूएस-१६२, एमएयूएस-६१२ व एमएयूएस-७१' तसेच बाजरीचे 'एचबी-१२००' या वाणांचा समावेश आहे. ज्वारी बियाणे १२५ रुपये प्रति किलो, मूग २२० रुपये, तूर २५० रुपये, सोयाबीन १०० रुपये तर बाजरी १९० रुपये प्रति किलो दराने उपलब्ध करण्यात आले आहे. विविध पिकांचे एकूण ३९७.२० क्विंटल बियाणे उपलब्ध असल्याची माहिती बीज प्रक्रिया केंद्राने दिली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### भाजपाच्या संघटनात्मक बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन; माणिक गरुड यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील सावली विश्रामगृह येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित संघटनात्मक बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत संघटन अधिक बळकट करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. भाजपाचे विचार, धोरणे आणि विकासाची दिशा तळागाळापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

बैठकीत भाजपाचे प्रदेश महामंत्री आ. सुनील राणे, परभणी शहर जिल्हा प्रभारी प्रवीण घुगे आणि मराठवाडा संयोजक नितीन काळे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. संघटन विस्तार, पक्षाची विचारधारा तसेच आगामी राजकीय वाटचालीबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी भारतीय जनता पार्टी परभणी महानगरच्या जिल्हा उपाध्यक्षपदी माणिक गरुड यांची निवड झाल्याची घोषणा करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल उपस्थितांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, माजी प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. मीनाताई परताणी, उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मानवत येथे २२ मे रोजी पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा : सुशिक्षित बेरोजगारांसाठी नोकरीची सुवर्णसंधी; विविध कंपन्यांमार्फत मुलाखतीद्वारे निवड

**परभणी,/प्रतिनिधी :**जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच मानवत येथील के. के. एम. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ मे २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता के. के. एम. महाविद्यालय, मानवत येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडून जिल्ह्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगारांना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने हा भव्य महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास विविध नामांकित राज्यातील मोठे उद्योजक/कंपन्या व जिल्ह्यातील खाजगी आस्थापना सहभाग नोंदविणार आहेत. दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची क्षेत्र अधिकारी, ट्रेनी ऑपरेटर, विमा सल्लागार, विमा सखी, लाईफ मित्र, कम्पाउंडर, इत्यादी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी वेतन १० ते २० हजार असून, अनुभवावरून वेतनामध्ये वाढ होऊ शकते. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत खाजगी आस्थापनांमध्ये प्रशिक्षणार्थींची निवड देखील करण्यात येणार असून त्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार प्रतिमाह ६ ते १० हजार इतके विद्यावेतन ११ महिन्यांकरिता देण्यात येणार आहे.

रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सुशिक्षित उमेदवारांनी नाव नोंदणी महाराष्ट्र शासनाच्या (..) या संकेतस्थळावर करावी. नाव नोंदणीची सुविधा महारोजगार मेळाव्याच्या ठिकाणी देखील करण्यात आलेली आहे. महारोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष नाव नोंदणी करण्यासाठी दि. २२ मे रोजी सकाळी ८.३० वाजता के. के. एम. महाविद्यालय, मानवत येथे स्वखर्चाने सर्व उमेदवारांनी उपस्थित राहावे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या दूरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त प्र. सो. खंदारे यांनी केले आहे.

### २८ मे रोजी परभणीत 'स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव' यात्रेचे आयोजन ; हिंदुत्ववादी संघटना व नागरिकांना उपस्थितीचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** हिंदू जननायक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त गुरुवार २८ मे रोजी परभणी शहरात प्रथमच भव्य 'स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रा' आयोजित करण्यात आली आहे.

या गौरव यात्रेची सुरुवात सायंकाळी ५.३० वाजता मध्यवस्तीतील गांधी पार्क येथून होणार आहे. श्री राम मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नानलपेठ कॉर्नर मार्गे विद्या नगरातील स्वातंत्र्यवीर स्मारक या ठिकाणी यात्रेचा समारोप होणार आहे. ही गौरव यात्रा हिंदुत्वाच्या जयघोषात, उत्साहपूर्ण वातावरणात आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांच्या प्रेरणेने पार पडणार आहे. या यात्रेत शहरातील सर्व हिंदुत्ववादी धार्मिक संस्था, सामाजिक संघटना, युवक मंडळे, महिला मंडळे, सावरकरप्रेमी तसेच राष्ट्रभक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन स्वातंत्र्यवीर सावरकर जन्मोत्सव समिती, परभणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सुकळी गावाची १०० टक्के स्वगणना पूर्ण : डिजिटल जनगणनेत संपूर्ण गावाचा सहभाग; प्रशासनाकडून ग्रामस्थांचे कौतुक

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील सुकळी गावाने देशातील सुरू असलेल्या डिजिटल जनगणना मोहिमेत १०० टक्के स्वगणना पूर्ण करून तालुक्यासह जिल्ह्यात आदर्श निर्माण केला आहे. गावातील सर्व ५३ कुटुंबांनी निर्धारित कालावधीत स्वगणना पूर्ण करत स्वगणना पूर्ण करणारे संपूर्ण गाव हा मान मिळवला आहे.

देशात प्रथमच डिजिटल स्वरूपातील जनगणना प्रक्रिया १ मे ते १५ मे या कालावधीत राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेत नागरिकांना स्वतःची स्वगणना करण्याची सुविधा प्रथमच उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्वगणना पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक नागरिकाला ङ्गएसई आयडीफ दिला जात असून, हा आयडी १६ मे पासून सुरू होणाऱ्या घरगणनेसाठी नियुक्त प्रगणकांना देण्यात येणार आहे. त्यामुळे घरगणनेच्या कामाला गती मिळणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, सेलूचे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, जिंतूरच्या तहसीलदार शितल कच्छवे तसेच नायब तहसीलदार प्रशांत राखे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली.या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, तहसीलदार शितल कच्छवे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, गट विकास अधिकारी सुभाष मानकर, गटशिक्षण अधिकारी त्र्यंबक पोले तसेच तहसील कार्यालयातील नागेश देशमुख, शेख इम्रान आणि अर्चना परडकर यांनी सुकळी ग्रामस्थांसह सोमेश्वर नव्हाट व सोपान खताळ यांचे अभिनंदन करून कौतुक केले.

## जिंतूरमध्ये गांजा विक्रीवर पोलिसांची धाड ; सव्वा सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

### आरोपी पोलिसांना चकवा देत फरार ; कायद्यान्वये गुन्हा दाखल

**जिंतूर./प्रतिनिधी:** शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मोकळ्या मैदानात उभ्या असलेल्या वाहनातून अवैधपणे गांजाची विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी (दि.१४ मे) सायंकाळी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत १ किलो १९० ग्रॅम गांजासह महिंद्रा वाहन असा एकूण ६ लाख २९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अभिजीत उर्फ बिल्ली सुभाष राठोड (रा. गणपती गल्ली, जिंतूर) हा त्याच्या ताब्यातील महिंद्रा कंपनीच्या ४६ २२२९ क्रमांकाच्या करड्या रंगाच्या जीपमधून गांजाची विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्हा परिषद शाळेच्या मैदान परिसरात सापळा रचून छापा टाकला.

दरम्यान पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने वाहन घटनास्थळी सोडून पळ काढला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला, मात्र तो अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. त्यानंतर महसूल राजपत्रित अधिकारी श्री. गायकवाड, सपोनि विजय जाधव व शासकीय पंचांच्या उपस्थितीत वाहनाची झडती घेण्यात आली.

या झडतीमध्ये वाहनातून १ किलो १९० ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत २९ हजार ७५० रुपये असून, वाहनाची अंदाजे किंमत ६ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी सविस्तर जप्ती पंचनामा करून एकूण ६ लाख २९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध १९८५ अंतर्गत कलम २०()() व २२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली चंदन परिहार, पांडुरंग तूपसुंदर, मुकेश बुधवंत, सिद्धेश्वर चाटे, माणिक डुकरे, राम पोळ, नामदेव डुबे व चालक कश्यप साने यांच्या पथकाने केली.



**वाघी धानोरा येथे समाधान शिबिरास उपजिल्हाधिकारी श्री शैलेश लाहोटी साहेब गेले असता वाघी धानोरा येथील माननीय परभणी जिल्ह्याचे कार्यसम्राट पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांचे खांदे समर्थक कैलास खंदारे यांनी त्यांच्या राहत्या घरी सत्कार करण्यात आला यावेळी जिंतूर चे तहसीलदार शितलताई कचवे जिंतूर पंचायत समिती चे सभापती किशोर जी खिस्ते जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गजाननराव वराड नायब तहसीलदार प्रशांत राखे यांच्यासह अनेक पदाधिकारी व अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.**

## पुणे विभागातील दुहेरीकरण कामामुळे अनेक रेल्वे गाड्यांचे मार्ग बदलले

**परभणी,/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील अकोलनेर-अहिल्यानगर-निंबळक या दरम्यान दुहेरीकरण प्रकल्पांतर्गत नॉन-इंटरलॉकिंग (एनआय) काम हाती घेण्यात येत असल्याने काही रेल्वे गाड्यांच्या मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. या बदलांमुळे मराठवाड्यासह परभणी मार्गावरील प्रवाशांवर परिणाम होणार असून काही गाड्या परिवर्तित मार्गाने धावणार आहेत.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक १७६२९ हडपसर-नांदेड एक्सप्रेस ही १५, १६ व १७ मे २०२६ रोजी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-पूर्णा मार्गे धावणार आहे. तर गाडी क्रमांक १७६३० नांदेड-हडपसर एक्सप्रेस ही याच कालावधीत पूर्णा-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-दौंड मार्गे धावेल. तसेच गाडी क्रमांक १७३२३ हुबळी-बनारस एक्सप्रेस ही १५ मे रोजी सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे धावणार आहे.

याशिवाय गाडी क्रमांक ११०२५ पुणे-अमरावती एक्सप्रेस ही १६, १७ व १८ मे रोजी पुणे-दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-पूर्णा-अकोला मार्गे धावेल, तर गाडी क्रमांक ११०२६ अमरावती-पुणे एक्सप्रेस ही १५, १६ व १७ मे रोजी अकोला-पूर्णा-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-दौंड-पुणे मार्गे धावणार आहे.

दरम्यान, गाडी क्रमांक १२६२७ बेंगळुरू-नवी दिल्ली एक्सप्रेस तसेच २०६५७ हुबळी-निजामुद्दीन एक्सप्रेस या गाड्याही सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे धावतील. तसेच २०६५८ निजामुद्दीन-हुबळी एक्सप्रेस ही १७ मे रोजी मनमाड-छत्रपती संभाजीनगर-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-सोलापूर मार्गे धावणार आहे.

गाडी क्रमांक ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस ही १५, १६ व १७ मे रोजी जन्कमपेठ-पूर्णा-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-दौंड मार्गे धावेल, तर ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस ही १६ व १७ मे रोजी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-पूर्णा-जन्कमपेठ मार्गे धावणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रवाशांनी प्रवासापूर्वी संबंधित गाड्यांचे वेळापत्रक आणि मार्गातील बदलांची माहिती रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा चौकशी केंद्रातून तपासून घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## परभणीत पुनर्विवाह जनजागृती अभियानाची तयारी सुरू : १५ मे ते २५ जूनदरम्यान जिल्हाभर जनजागृती; पुनर्विवाह नोंदणी व वधू-वर परिचय मेळाव्यांची माहिती देणार

**परभणी/प्रतिनिधी:** मराठा प्रवाह समन्वय समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुनर्विवाह जनजागृती अभियानाच्या नियोजनासाठी जिल्हा कार्यकारिणीची बैठक परभणी येथे उत्साहात पार पडली. १५ मे २०२६ ते २५ जून २०२६ या कालावधीत परभणी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये शहरासह ग्रामीण भागात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या मराठा प्रवाह समन्वय समितीच्या माध्यमातून हे अभियान हाती घेण्यात आले आहे. येथील विभागीय कार्यालयात आयोजित बैठकीत अभियानाची रूपरेषा जाहीर करण्यात आली. यावेळी धाराजी भुसारे यांनी अभियानाविषयी सविस्तर माहिती दिली. जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागात पुनर्विवाहाची गरज, पुनर्विवाह नोंदणी प्रक्रिया तसेच पुनर्विवाह वधू-वर परिचय मेळाव्यांबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुनर्विवाह नोंदणी विनामूल्य करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

बैठकीत तालुका कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या-आपल्या तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या नियोजनाबाबत मनोगत व्यक्त केले. या अभियानात सहभागी होण्यासाठी अथवा पुनर्विवाह नोंदणीसाठी मराठा प्रवाह समन्वय समिती कार्यालय, जिल्हा विशेष लेखा परीक्षण कार्यालयासमोर, शिवाजीनगर, परभणी येथे संपर्क साधावा किंवा ९८२३१२५२२७, ८००७५८६१०२, ८६९८३८९०५४ या क्रमांकांवर संपर्क करण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## मानवतमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या रस्त्याचे काम सुरू

### बायपास ते डम्पिंग ग्राउंड मार्ग होणार कायमस्वरूपी : मुख्याधिकारी सौ. कोमल सावरे यांनी केली पाहणी

**मानवत,/प्रतिनिधी:** शहरातील मानवत बायपास राष्ट्रीय महामार्ग ते डम्पिंग ग्राउंडपर्यंत अत्याधुनिक व वैज्ञानिक पद्धतीने नवीन प्रणालीचा दर्जेदार रस्ता तयार करण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. मानवतच नव्हे, तर संपूर्ण परभणी जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ता उभारला जात आहे.

या रस्त्याच्या बांधकामात प्रथम संपूर्ण खोदकाम करून रोलर कॉम्पॅक्शनच्या सहाय्याने मजबूत पाया तयार करण्यात येत आहे. त्यानंतर पॉवर रोलरद्वारे कॉंक्रीट मिक्सिंग करून मिश्रणातील हवा पूर्णपणे बाहेर काढली जात असून, सर्व गॅप व्यवस्थित भरून काढले जात आहेत. या प्रक्रियेनंतर कॉंक्रीट बेड टाकून रस्ता तयार केला जाणार आहे. त्यामुळे भविष्यात रस्त्यावर तडे जाण्याची शक्यता अत्यल्प राहणार असून, रस्त्याचे आयुष्य मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचे सांगण्यात आले. या रस्त्याचा थेट लाभ के.के.एम. कॉलेज, शकुंतला शाळा, जिजाऊ नगर, नरवटे कॉलनी, संभाजी पार्क, नगरपरिषद वसाहत, हमालवाडी, मोदकेश्वर नगर, शनी मंदिर परिसर, गांडूळ खत प्रकल्प तसेच लमानी तांडा परिसरातील हजारो नागरिक, विद्यार्थी आणि वाहनधारकांना होणार आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामाची नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात मागणी होती. कामास काहीसा कालावधी लागला असला तरी साधा रस्ता नव्हे, तर दर्जेदार आणि दीर्घकाळ टिकणारा रस्ता उभारण्यावर भर देण्यात येत असल्याचे संबंधितांनी सांगितले. त्यामुळे स्थानिक नागरिक, विद्यार्थी, शिक्षक व ज्येष्ठ नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

या कामाची पाहणी मुख्याधिकारी सौ. कोमल सावरे, डॉ. अंकुश लाड, नगर अभियंता सईद अन्वर, नगरसेवक दत्ताराव चौधरी, डॉ. राजेश्वर दहे, बाजीराव हालनोर, किशोर लाड, गणेश उगले, स्वप्नील शिंदे, राजेश वासुंबे तसेच परिसरातील नागरिकांनी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या

## अग्रलेख...

# 'सहकार्य' पर्वाचा प्रारंभ

पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक सत्तांतरानंतर झालेल्या नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत शुभेन्दू अधिकारी सरकारने घेतलेले निर्णय हे केवळ प्रशासकीय स्वरूपाचे नसून ते ममता बॅनर्जी सरकारच्या गेल्या १५ वर्षांच्या राजकीय भूमिकेवर थेट भाष्य करणारे ठरले आहेत. सीमा सुरक्षा, केंद्राच्या योजनांची अंमलबजावणी, सरकारी भरती, कायदेव्यवस्था आणि प्रशासनातील केंद्र-राज्य संबंध या सर्वच मुद्द्यांवर 'दिशाबदल' करण्याचा नवा प्रयत्न नव्या सरकारने ठामपणे सुरू केला असून अराजकाच्या सावटाखाली सतत वावरत असलेले हे राज्य आता सुशासनाच्या दिशेने वाटचाल करेल, असे संकेतही मिळू लागले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी परस्परांच्या विरोधात भूमिका घेतली तर अंतिमतः राज्यांचेच नुकसान अधिक होते, हे ममता सरकारच्या काळातील हट्टाग्रहामुळे दिसून आले होते. केंद्र सरकारच्या अनेक जनहिताच्या योजनांनादेखील पश्चिम बंगालमध्ये प्रवेशबंदी करून ममता बॅनर्जी यांनी जनतेस अनेक योजनांच्या लाभापासून वंचित ठेवल्याचा आरोप केला जातो. पश्चिम बंगालमध्ये ममता सरकारने केंद्राच्या काही महत्त्वाच्या योजनांना पूर्णतः नकार दिला किंवा त्यांची अंमलबजावणी दीर्घकाळ लांबवली, हा आरोप केवळ राजकीय प्रचारापुरता मर्यादित नाही. त्यामागे काही वस्तुनिष्ठ उदाहरणेही आहेत. विशेषतः केवळ श्रेयवादातून ममता सरकारने केंद्राच्या काही योजना नाकारून राज्याच्या योजना लागू करण्याची भूमिका घेतल्याने, काही योजनांसाठी केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीस राज्य मुकले, काही योजना श्रेयवादाच्या गर्तेत गुरफटत राहिल्या तर काही योजनांच्या अंमलबजावणीवरील नियंत्रणाची भूमिका घेत ममता बॅनर्जी सरकारने केंद्राशी सातत्याने संघर्षाचाच पवित्रा ठेवला, असेही आरोप केले जातात. आयुष्मान भारत किंवा प्रधानमंत्री जनआरोग्य योजना ही केंद्राची आरोग्य विमा योजना ममता बॅनर्जी यांनी २०१९ मध्ये नाकारली आणि राज्याची स्वतःची स्वास्थ्य साथी योजना सुरू केली. त्यामुळे देशभरातील गरीब नागरिकांसाठी लागू असलेल्या आरोग्य विम्याचा लाभ पश्चिम बंगालमधील गरीब नागरिकांना मिळाला नाही. केंद्र सरकारला योजनेच्या श्रेयाचा लाभ नाकारण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये राज्याची स्वतःची योजना राबविणाऱ्या ममता सरकारने प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेबाबतही केंद्र सरकारशी असहकार पुकारल्याने पश्चिम बंगालचा शेतकरी दीर्घकाळ या योजनेपासून वंचित राहिला. पीएम आवास योजनेबाबतही भ्रष्टाचार, अपात्र लाभार्थींची निवड, अनियमितता असे आरोप होत राहिले.

आता सत्तांतरानंतर समन्वयाचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. शुभेन्दु अधिकारी सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत संघर्षाचा अध्याय संपवून सहकार्याचा नवा अध्याय सुरू करण्याची समंजस भूमिका घेण्यात आली आहे. नव्या सरकारने सुशासनाची घडी बसविण्यास प्राधान्य दिले आहे, असे संकेत पहिल्याच बैठकीत मिळाले आहेत. ममता सरकारने केंद्रासोबत संघर्षाचा पवित्रा घेतल्याने तेथील जनता केंद्राच्या योजनांपासून मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहिलीच; पण भारतातील केंद्र-राज्य संघर्ष, राजकीय श्रेयवादाची लढाई आणि संघराज्य व्यवस्थेतील मतभेद यांचे एक अप्रिय चित्रदेखील समोर आले होते. ते पुसण्याचा प्रयत्न आता सुरू झाला असून पश्चिम बंगाल सरकार आणि केंद्र सरकार यांच्या सहकार्यातून दीर्घकाळ रेंगाळलेल्या काही संवेदनशील समस्या मार्गी लागणार आहेत, ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. बांगलादेश सीमेलगत कुंपण उभारण्याबाबत केंद्र सरकारच्या आग्रहाकडे ममता सरकारने सतत कानाडोळा केला आणि यासंदर्भातील न्यायालयाचे आदेशही नजरेआड केले, असा गंभीर आक्षेप सातत्याने ममता बॅनर्जी यांच्या सरकारविरोधात घेतला जात होता. शुभेन्दू सरकारने हा प्रश्न निकाली काढून एका महत्त्वाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी घेतलेला पुढाकार भविष्यातील अनेक समस्यांची पाळेमुळे खणून काढणारा ठरणार आहे. बांगलादेश सीमेलगत कुंपण घालण्यासाठी पुढच्या दीड महिन्यात सीमा सुरक्षा दलास जमीन हस्तांतरित करण्याचा मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत घेतलेला हा महत्त्वाचा निर्णय केवळ सुरक्षाविषयक मुद्दा नाही, हे खरेच आहे. ममता सरकारने सातत्याने घुसखोरीकडे केलेल्या दुर्लक्षावरील हे राजकीय प्रत्युत्तर आहे. सीमा प्रश्नास मानवतेच्या दृष्टिकोनाचा मुलामा देत घुसखोरांना कणव दाखविण्यामागील राजकारणाचा बेगडीपणा देशाच्या सुरक्षिततेसमोरील आव्हान ठरतो. या प्रश्नाकडे ममतेच्या दृष्टीने पाहणे योग्य नाहीच, हे शुभेन्दू सरकारने या प्रत्युत्तरातून दाखवून दिले आणि सीमा सुरक्षा हा राष्ट्रीय सुरक्षेचा मानला आहे. केवळ मोदी सरकारला राजकीय श्रेय मिळू द्यायचे नाही यासाठी 'आयुष्मान भारत' सारखी जनहिताची योजना नाकारून राज्याची स्वतंत्र योजना आणण्याची भूमिका घेत ममता बॅनर्जी यांनी केंद्राच्या योजनांपासून पश्चिम बंगालला अलग राखण्याचा अनाकलनीय अट्टहास जपला. आता नव्या सरकारने केंद्राच्या या योजना पश्चिम बंगालमध्ये लागू करून 'डबल इंजिन' या संकल्पनेचाही स्वीकार केला आहे. शिक्षक भरती घोटाळा आणि भरती प्रक्रियेतील कथित भ्रष्टाचारामुळे ममता सरकारची प्रतिमा मोठ्या प्रमाणावर मलिन झाली होती. अनेक तरुणांचे रोजगाराचे वय निघून गेले, अशी भावना राज्यात निर्माण झाली होती. सरकारी नोकऱ्यांसाठी वयोमर्यादा वाढविण्याचा निर्णय घेऊन शुभेन्दू सरकारने ममता सरकारच्या काळातील एका अन्यायाचे प्रायश्चित्त घेतले आहे. वयोमर्यादा वाढविण्याचा हा निर्णय राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहेच; पण ती केवळ प्रशासनिक सवलत नसून नाराज तरुण मतदारांना दिलेला राजकीय संदेश आहे. धार्मिक स्थळांच्या परिसराबाहेर आवाज जाणार नाही एवढी काळजी घेऊन ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यावरील निर्बंधांतून नव्या सरकारने धर्मस्वातंत्र्य रस्त्यावर आणण्याच्या हट्टाला लगाम घातला आहे. विशेष प्रसंग वगळता धार्मिक स्थानांच्या जवळपासचे रस्ते व्यापून जनतेची गैरसोय करण्यास पूर्ण बंदी घालण्याचा निर्णय अन्य राज्यांना अनुकरणीय ठरावा.

अर्थात, नव्या सरकारच्या या निर्णयांकडे पाहताना एक बाब विशेष लक्षणीय ठरते. ममता बॅनर्जी यांनी बंगालच्या राजकारणाला केवळ निवडणुकीच्या पातळीवर बदलले नाही, तर त्यांनी डाव्या आघाडीच्या ३४ वर्षांच्या सत्तेला समाप्त करून ग्रामीण महिला, अल्पसंख्यक, गरीब वर्ग आणि लाभार्थी योजनांवर आधारित नवे राजकीय समीकरण निर्माण केले. लक्ष्मी भांडार, स्वास्थ्य साथी, कन्याश्री यांसारख्या योजनांमुळे ममता बॅनर्जी यांना व्यापक जनाधार मिळाला होता. त्यामुळेच या योजना कायम ठेवण्याची घोषणा शुभेन्दू सरकारला करावी लागली आहे. कल्याणकारी राष्ट्रकारणाची दृष्टी असेल तर तेथे राजकारणाचा अडसर असू नये आणि त्यामध्ये नाहक सूडबुद्धी किंवा कुरघोडीचे डावपेचही असू नयेत, एवढा समंजसपणा या नव्या सरकारने निश्चितच दाखविला आहे. जनहिताच्या योजना अधिकाधिक पारदर्शकपणे राबविल्या तर जनाधार अधिकाधिक भक्कम होतो, हे उदाहरण या योजनांतून ममता बॅनर्जी यांनी सिद्ध केले होते. राजकारणावरच नवी कड मजबूत करावयाची असेल, तर तीच नीती वापरावी लागेल, याची जाणीवही असल्याचा संदेश या मंत्रिमंडळाने दिला आहे. बंगालमधील सत्तांतर म्हणजे केवळ पक्षबदल नाही; ममता बॅनर्जींचे सरकार गेले आणि जनतेने शुभेन्दू अधिकारी यांच्या भाजपाला सत्तास्थापनेचा कौल दिला एवढाच त्याच अर्थ नाही. हे दोन राजकीय दृष्टिकोनांतील संक्रमण आहे. एकीकडे ममता बॅनर्जींनी जोपासलेली प्रादेशिक अस्मिता, केंद्रविरोधी भूमिका आणि कल्याणकारी लोकाभिमुखता; तर दुसरीकडे भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सुरक्षेस सर्वोच्च प्राधान्य, राज्य व केंद्र सरकारांतील समन्वयाचे धोरण, प्रशासकीय पुनर्रचनेतून सुशासनाची पायाभरणी असा या सत्तापालटाचा अर्थ आहे. बंगालची जनता नेमक्या कोणत्या दिशेला दीर्घकाळ पाठिंबा देते, हे पुढील काही वर्षांत स्पष्ट होईलच; पण पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयांनी ममता युगावर राजकीय टीका करण्याची एकही संधी नव्या सत्ताधाऱ्यांनी सोडलेली नाही, हे मात्र पुरेसे स्पष्ट झालेले आहे. पश्चिम बंगालमध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनाचे लाभार्थी अंतिमतः तेथील जनताच ठरणार असल्याने, नव्या सरकारच्या पहिल्या पावलांचे स्वागत झाले असेल, यातही शंका नाही. ▮

---

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# आयकर रिटर्न भरायचाय्? अशी करा तयारी

दरवर्षी आयकर रिटर्न भरण्याच्या काळात अनेक करदाते घाईगडबडीत कागदपत्रे शोधू लागतात. काहींना फॉर्म १६ मिळालेला नसतो, काहींना शेअर्समधील नफा कसा दाखवायचा हे समजत नाही, तर काही जण एफडीवरील व्याज किंवा मालमत्ता विक्रीची माहिती रिटर्नमध्ये दाखवायची विसरतात. परिणामी चुकीचा रिटर्न भरला जातो, आजच्या डिजिटल युगात आयकर विभागाकडे करदात्यांच्या जवळपास सर्व आर्थिक व्यवहारांची माहिती उपलब्ध असते. बँक व्यवहार, शेअर्समधील गुंतवणूक, म्युच्युअल फंड, मालमत्ता व्यवहार, क्रेडिट कार्ड खर्च टीडीएस, जीएसटी माहिती, परकीय व्यवहार अशा अनेक गोष्टी एआयएस (वार्षिक माहिती विवरण) आणि फॉर्म २६एएस मध्ये दिसतात. त्यामुळे कोणतीही माहिती लपविणे किंवा चुकीची दाखविणे भविष्यात महागात पडू शकते. त्यामुळे आर्थिक वर्ष २०२५-२६ (मूल्यांकन वर्ष २०२६-२७) साठी आयकर रिटर्न भरताना कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, कोणत्या गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे आणि कोणत्या चुका टाळाव्यात हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

१. **मूलभूत माहिती** : प्रत्येक करदात्यासाठी आवश्यक : रिटर्न भरण्यापूर्वी खालील कागदपत्रे आणि माहिती तयार ठेवणे आवश्यक आहे- पॅन कार्ड, आधार कार्ड, आयकर पोर्टलचा लॉगिन पासवर्ड, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी, बँक पासबुक किंवा बँक स्टेटमेंट, कर्ज विवरण. याशिवाय खालील माहिती असल्यास ती कर सल्लागाराला सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे:

**अतिरिक्त खुलासे** - शेअर्स किंवा म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक, कंपनी किंवा एलएलपीमध्ये संचालक/भागीदार असणे, परदेशातील बँक खाते, मालमत्ता किंवा गुंतवणूक, परदेशी उत्पन्न, क्रिप्टो व्यवहार अनेक वेळा करदाते या गोष्टी 'महत्त्वाच्या नाहीत' असे समजून सांगत नाहीत. परंतु ए.आय.एस मध्ये माहिती दिसत असल्यामुळे सूचना येऊ शकते.

२. **पगारदार कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक कागदपत्रे** : फॉर्म १६, पगाराच्या पावत्या, थकबाकी वेतनची माहिती, नियोक्ता प्रमाणपत्र. फॉर्म १६ उपलब्ध नसल्यास? काही वेळा कंपनीकडून फॉर्म १६ वेळेत मिळत नाही. अशा वेळी वेतन क्रेडिट दिसणारे बँक स्टेटमेंट, पगाराच्या पावत्या, नियोक्ता पत्र, स्वतःच्या पगाराची गणना यांच्या आधारे रिटर्न भरता येतो.

**नोकरी बदलल्यास...**: एका आर्थिक वर्षात दोन किंवा अधिक नोकऱ्या केल्यास सर्व कंपन्यांचे उत्पन्न एकत्र दाखवणे आवश्यक असते. अनेक करदाते एका फॉर्म १६ वरच रिटर्न भरतात; नंतर कर मागणी येते.

३. **घराची मालमत्ता आणि गृहकर्ज संबंधित माहिती** : मालमत्तेचा संपूर्ण पत्ता, भाडे करार, वर्षभरात मिळालेले भाडे, मालमत्ता कर पावती, गृह कर्ज व्याज प्रमाणपत्र. गृहकर्जावर मिळणाऱ्या करसवलती : कलम २४: गृहकर्जावरील व्याज वजावट. कलम ८०सी : वजावटीवर मुद्दल परतफेड. भाडे मिळत नसले तरी माहिती द्यावी : स्वतः राहत असलेले घर, रिकामी मालमत्ता किंवा भाड्याने दिलेली मालमत्ता माहिती योग्य प्रकारे दाखविणे आवश्यक.

४. **व्यावसायिक आणि व्यावसायिक उत्पन्न** : सर्वाधिक तपासणी होणारा विभाग- व्यवसायिक, डॉक्टर, वकील, सीए, आर्किटेक्ट, कंत्राटदार, सल्लागार, फ्रिलान्सर यांनी अत्यंत काळजीपूर्वक रिटर्न भरावा. हिशेबाची पुस्तके सांभाळावी लागतात- ताळेपत्रक, नफा-तोटा पत्रक, रोकड पुस्तक, खातेवही, जीएसटी रिटर्न, बँक स्टेटमेंट. खाते मुख्य खाते : विक्रीची माहिती, खर्चाची माहिती, कर्जदार/कर्जदार, स्टॉक तपशील, रोख आणि बँक शिल्लक बंद करणे. जीएसटी नोंदणीकृत व्यवसायांनी विशेष लक्ष द्यावे : जीएसटी रिटर्न आणि आयकर परतावामधील विक्री जुळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ: जीएसटीमध्ये १ कोटी विक्री दाखवले आणि आयटीआरमध्ये ८० लाख दाखवले तर सूचना येण्याची शक्यता वाढते.

५. **भांडवली नफा** : शेअर्स, म्युच्युअल फंड, मालमत्ता, सोने, क्रिप्टो यांवरील व्यवहार योग्य प्रकारे दाखवणे अत्यंत आवश्यक आहे.

**ए.** शेअर्स/सिक्युरिटीज/म्युच्युअल फंड्स : आवश्यक कागदपत्रे- ब्रोकरचा नफा/तोटा अहवाल, शेअरनिहाय प्रवेश आणि निर्गमन तारखा, वार्षिक होल्डिंग स्टेटमेंट, लाभांश विवरण. विशेष लक्ष द्या: इंट्राडे ट्रेडिंग, एफ अँड ओ व्यवहार, सट्टेबाजी उत्पन्न, दीर्घकालीन/अल्पकालीन भांडवली नफा, तोटा समायोजन अनेक वेळा ब्रोकर ॲपमध्ये नफा दिसतो, पण कर गणना वेगळी असते. **बी.** स्थावर मालमत्ता विक्री मालमत्ता विक्रीमध्ये पुढील कागदपत्रे आवश्यक असतात- खरेदी करार, विक्री करार, मुद्रांक शुल्क मूल्यांकन, ब्रोकरेज आणि विक्री खर्च, सुधारणा खर्चाचे पुरावे. अनुक्रमणिकाचा फायदा : जुनी मालमत्ता विकताना अनुक्रमणिकामुळे कॅपिटल गेन टॅक्स मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. **सी.** सोने/दागिने/क्रिप्टो व्यवहार : आज क्रिप्टो व्यवहार आयकर विभागाच्या विशेष लक्षात आहेत. त्यासाठी खरेदीची बिले, विक्रीची बिले, वॉलेट स्टेटमेंट, एक्सचेंज रिपोर्ट जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

६. **इतर उत्पन्न विसरू नका** : बचत बँकेवरील व्याज, मुदत ठेवीवरील व्याज, लाभांश उत्पन्न, शेती उत्पन्न, कमिशन उत्पन्न, बॉण्डवरील व्याज, फ्रिलान्सिंग उत्पन्न, इतर व्याज उत्पन्न, ए.आय.एस.मध्ये ही माहिती दिसत असल्यामुळे ती दाखवणे आवश्यक आहे.

७. **करबचत गुंतवणूक आणि खर्च** : करसवलतीसाठी खालील गुंतवणुकींचे पुरावे आवश्यक असतात: एलआयसी प्रीमियम, मुलांची शाळेची फी, गृहकर्जाचे मुद्दल, कर बचत एफडी, पीपीएफ गुंतवणूक, एनपीएस गुंतवणूक, सुकन्या समृद्धी, एनएससी गुंतवणूक, मेडिक्लेम प्रीमियम, अपंगत्व कपातीची कागदपत्रे, शैक्षणिक कर्ज व्याज प्रमाणपत्र, देणगीच्या पावत्या, भाड्याच्या पावत्या, इलेक्ट्रिक वाहन कर्जावरील व्याज

८. **कलम ८७अ अंतर्गत सवलत** : नवीन करप्रणालीमध्ये पात्र व्यक्तींना कलम ८७अ अंतर्गत करसवलत मिळू शकते. परंतु भांडवली नफा उत्पन्न, विशेष दर उत्पन्न, लॉटरी किंवा सट्टेबाजी उत्पन्न असल्यास सूटवर परिणाम होऊ शकतो.

**रिटर्न भरण्याच्या महत्त्वाच्या तारखा** : गैर-व्यावसायिक करदाते (व्यक्ती/हिंदू अविभक्त कुटुंब) अंतिम तारीख : ३१ जुलै २०२६. व्यावसायिक करदाते (व्यवसाय/व्यावसायिक/एलएलपी) अंतिम तारीख : ३१ ऑगस्ट २०२६

**उशिरा रिटर्न भरल्यास दंड** : विलंब शुल्क : उत्पन्न ५ लाखांपर्यंत - १,०००, उत्पन्न ५ लाखांपेक्षा जास्त - ५,००० याशिवाय परतावा देऊ शकतो, तोटा पुढे नेत नाही, व्याज लागू होऊ शकते, सूचना येण्याची शक्यता

**कोणाला आयकर रिटर्न भरणे आवश्यक आहे?**

मूलभूत सूट मर्यादा जास्त असल्यास, टी.डी.एस. वजावट, भांडवली नफा किंवा क्रिप्टो व्यवहार असल्यास, व्यवसाय किंवा व्यावसायिक उत्पन्न असल्यास, कर्ज/व्हिसा/टेंडर उत्पन्नाचा पुरावा आवश्यक असल्यास, विदेशी मालमत्ता किंवा परकीय उत्पन्न असल्यास उदयत आणि योग्य रिटर्न भरण्याचे फायदे : बँक कर्ज मंजुरी होते, व्हिसा प्रक्रियेमध्ये मदत होते, आर्थिक विश्वासार्हता, भविष्यातील सूचना, कर नियोजन योग्य प्रकारे. 'वेळेत रिटर्न भरा, कायदेशीररीत्या करबचत करा आणि भविष्यातील अडचणी टाळा' हे प्रत्येक जबाबदार करदात्याने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. ▮

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

---

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# गर्लफ्रेंड कल्चरचा 'खेळ'!

'जेण्टलमन्स गेम' म्हणून ओळखला जाणारा क्रिकेटचा खेळ सध्या भलत्याच कारणांमुळे चर्चेत आला आहे. मैदानावर बॅट आणि बॉलच्या सामान्यातील रंगत फिकी पडून, पॅव्हेलियनमधील दृश्ये 'रसभरीत' ठरू लागली आहे. किमान यंदाचा आयपीएल सिझन तरी एवढ्याचसाठी आणि विशेषत्वाने 'गर्लफ्रेंड कल्चर'साठी लक्षात राहणार आहे. कॅमेऱ्यासमोर जे दिसतंय त्यापेक्षा कितीतरी जास्त कॅमेऱ्यामागे खरोखर घडतंय आणि हे सगळं इतकं गंभीर आहे की, नियामक मंडळाला त्यासाठी धोरण आखण्याची गरज भासते आहे.

क्रिकेटचा खेळ भारतीयांसाठी केवळ मनोरंजन नाही तर प्रत्येक युवा पिढी घडविणारा एक धर्म आहे. प्रश्न खेळभावनेचा तर आहेच; सोबतच खेळातील नीतिमूल्यांचा आणि संयमाचा आहे. आज लहानशी दिसणारी ही समस्या वास्तवात हाताबाहेर गेलेलं प्रकरण आहे. मुंबई इंडियन्सच्या कर्णधारापासून सुरू झालेलं हे प्रकरण पॅव्हेलियनमध्ये बसून वेपिंग करण्यापर्यंत गेलं आहे. मालिकेदरम्यान, पत्नी किंवा अगदी कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला खेळाडूसोबत हॉटेलमध्ये राहण्याची परवानगी होती. पण, अलिकडे खेळाडूंच्या गर्लफ्रेंड्सचे प्रस्थ वाढलेले दिसू लागले. मैदानावर खेळाडूंना घेऊन जाणारी बस या गर्लफ्रेंड्ससाठी थांबू लागली, आयपीएलच्या संपूर्ण प्रक्रियेतील गोपनीयता चव्हाट्यावर येऊ लागली. बहुतांश 'गर्लफ्रेंड्स' सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असल्यामुळे स्टेडियमच्या आत-बाहेरचं सगळंच रीलमध्ये झळकू लागलं. विशेषतः हार्दिक पांड्याच्या प्रकरणानंतर हे विशेषत्वाने उघड झालं. आयपीएलपूर्वी एकदिवसीय सामन्यांच्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातही 'खुल्लम खुल्ला' प्रेमाची चर्चा झालीच.

गर्लफ्रेंड्स सोबत मिरवण्यामुळे संघशिस्तीचा भंग, खेळामध्ये एकाग्रता नसणे आणि सुरक्षा नियमांचं उल्लंघन वारंवार घडू लागलं आणि यातून 'गर्लफ्रेंड कल्चर'चा उदय झाला. युवापिढीसाठी 'रोल मॉडेल' असणारे खेळाडू सामना सुरू असताना, कॅमेऱ्यांसमोर ई-सिगारेट ओढून वेपिंग करत असतील, तर चाहते म्हणून आपल्यालाच क्रिकेटचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. कोणत्याही खेळाडूसाठी शिस्त हा दागिना असावा, ओझं नाही. डग आऊटमध्ये बसून किंवा व्लॉग्ज्मध्ये, खेळाविषयीच्या चर्चेपेक्षा नशेच्या धुराची वलयं दिसत असतील तर हे केवळ नियमांचे उल्लंघन नाही तर, कोट्यवधी भारतीयांच्या विश्वासाची उघडउघड केलेली हत्या आहे. क्रिकेटचे मैदान पब किंवा क्लब नाही की, खेळाडू तिथे बसून नशा करतील. मैदान तर खेळाडूंच्या घामाच्या थेंबांची शाई करून इतिहास लिहिण्यासाठी आहे. कॅमेऱ्यासमोर नशेडी क्रिकेटपटूंना बघणाऱ्या लोकांच्या मनात साहजिकच प्रश्न येतो की, कॅमेऱ्यासमोर हे असं आहे तर मागे काय सुरू असेल?

'नो गर्लफ्रेंड' आणि नशा रोखण्यासाठी कठोर सुरक्षा यंत्रणा लावणाऱ्या बीसीसीआयला आज कोणी बुरसटलेल्या विचारांचे म्हणत असले, तरी क्रिकेटला सोशल मीडियाचा 'कंटेन्ट' बनविण्यापासून रोखण्यासाठी अशी कार्यवाही आवश्यक आहे. या सगळ्या गोंधळात आरोप-प्रत्यारोप झाले आणि त्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून क्रीडा पत्रकारांवरही ठपका ठेवला गेला. पण, यथावकाश ट्विट डिलीट झाल्या आणि बदलल्याही गेल्या. खेळभावनेतून जय-पराजय स्वीकारावा, हे तर क्रीडातंत्राचे मूळ आहे. आताशा लोकतंत्रातही पराभव स्वीकारून पद सोडणे, किती कठीण आहे हे आपण पश्चिम बंगालमध्ये बघत आहोतच. पैसा आणि यश डोक्यात जाणार असेल तर आयपीएलच्या सगळ्या युवा खेळाडूंनी थोडं थांबून विचार करण्याची आणि त्यांच्या पाठीशी असलेल्या भारतीय क्रिकेटच्या धुरंधरांच्या 'लीगसी'कडे वळून बघण्याची गरज आहे. आयपीएलची खरी ताकद त्यात असलेल्या पैसा आणि ग्लॅमरच फक्त नाही तर लोकांचे प्रेम आहे. क्रिकेटचा तो खेळ आहे ज्याने गल्लीबोळांपासून भव्य स्टेडियमपर्यंत भारतीयांची मनं जोडली आहेत.

क्रिकेट म्हणजे निर्जीव व्हिडीओ गेम नाही. त्यातील थरार, जिंकण्याची धडपड, पराभवानंतरचा मोकळेपणा आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे 'हिरो' म्हणून असलेली खेळाडूंची प्रतिमा क्रिकेटधर्मीयांना हवी आहे. आयपीएलची व्ह्युअरशिप घसरण्यामागे हेदेखील एक कारण आहे. आयपीएलचे ग्लॅमर, खेळाडूंचा 'सेलिब्रिटी' बनण्याचा झटपट झालेला प्रवास, सुमार परफॉर्मन्समध्येच हाती खेळणारा पैसा आणि त्यातून आलेला वैयक्तिक अहंकार 'इतिहास' घडवू शकणार नाही. क्रिकेटचा आत्मा वाचविण्यासाठी खेळाडूंना शिस्त आणि संयम बाळगून 'गर्लफ्रेंड कल्चर'मधून बाहेर पडावं लागेल. ब्रॅण्ड व्हॅल्यू, स्पॉन्सरर्सचा पैसा 'सुपरस्टार कल्चर' निर्माण करायला पुरेसे आहेत. पण, वैयक्तिक जीवन बाजूला ठेवून, कॅमेरा ॲंगल्सकडे दुर्लक्ष करून मैदानावर उतरले तरच 'जण्टलमन स्पिरीट' कायम राहणार आहे. साबरी ब्रदर्सची कव्वाली इथे आवर्जून आठवते,

*'संसार में बाजे ढोल, ये दुनिया मेरी तरह है गोल, कि पैसा बोलता है...'* ▮

९८५०३३९२४०

---

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# ...तुला देतो ई-पैसा

कोणतेही तंत्रज्ञान स्वीकारताना काही मापदंड तपासून पाहावे लागतात. नव्या तंत्रज्ञानामुळे वेळ वाचणार आहे का, श्रम कमी होणार आहेत का, उत्पादन क्षमता वाढणार आहे का, खर्च कमी होणार आहे का, ते वापरणे सोपे जाणार आहे का, अशा प्रश्नांचे उत्तर 'हो' असेल तर ते तंत्रज्ञान स्वीकारावे, असा नियम आहे. या कसोट्यांवर मोबाईल तंत्रज्ञान तपासून पाहिले तर ते 'सौ प्रतिशत खरा' ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये मोबाईल तंत्रज्ञानामुळे शक्य आणि लोकप्रिय झालेल्या 'युपीआय'चाच विचार केला तरी त्याचे अगणित फायदे सांगता येतील.

कॉम्प्युटर, इंटरनेट, स्मार्टफोनसारख्या घटकांमुळे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. बदलत्या तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन होणार आहे. त्यामुळेच या तंत्राचे व्यावहारिक उपयोग वाढताना दिसणार आहेत. 'येरे येरे पावसा तुला देतो पैसा' हे गाणे सर्वश्रुत आहेच. आता पाऊस येईल, पण त्याला द्यायला लागणारे पैसे हळूहळू भौतिक जगातून नाहीसे होत आहेत. पूर्वी पैसा म्हणजे हातात असणारी नाणी, नोटा, खिशात ठेवलेले पाकीट हे सर्व आपल्याला परिचित होते. पण २०२६ च्या जगात हा पैसा हळूहळू अदृश्य होत आहे. ई-पैसा म्हणजेच डिजिटल पैसा आता आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालला आहे. भारतात पैशाच्या व्यवहारांमध्ये मोठी क्रांती घडली आहे. मोबाईलच्या साहाय्याने क्षणात पैसे पाठवणे, बिले भरणे, खरेदी करणे अगदी सहज झाले आहे. आज शहरांपासून गावांपर्यंत प्रत्येक ठिकाणी मोबाईलद्वारे व्यवहार होताना दिसतात. आज भारतात युपीआयने अक्षरशः आर्थिक क्रांती घडवून आणली आहे. गावोगावी छोट्या विक्रेत्यांकडेही क्यूआर कोड दिसतो. रिक्षावाले, फळविक्रेते, अगदी मंदिरातील देणग्याही डिजिटल पद्धतीने स्वीकारल्या जात आहेत. २०२६ मध्ये ही सवय इतकी अंगवळणी पडली आहे की, रोख पैसे नसले तरी व्यवहार थांबत नाहीत. स्मार्टफोन केवळ बोलण्यासाठीचे साधन राहिलेला नाही, तर एक प्रकारचे डिजिटल पाकीट बनला आहे. आपले बँक खाते, पैसे, व्यवहारांची माहिती सर्व काही या एका उपकरणात साठवलेले असते. बँकेत जाण्याची गरज कमी झाली आहे. याचबरोबर 'नियर फिल्ड कम्युनिकेशन' म्हणजेच फोन किंवा कार्ड फक्त यंत्राजवळ नेले की व्यवहार पूर्ण होतो, ही पद्धत वाढत आहे. बस, मेट्रो, दुकाने, रुग्णालये अशा सर्व ठिकाणी ही सुविधा उपलब्ध होत आहे. व्यवहार अधिक जलद आणि सोपे झाले आहेत. तंत्रज्ञानाची ही घोडदौड इथेच थांबणारी नाही. २०३० पर्यंत आपण वेअरेबल टेक्नॉलॉजी म्हणजे घड्याळ, चष्मा किंवा अगदी शरीरात बसवलेली सूक्ष्म चिप यांच्याद्वारे व्यवहार करताना पाहू शकतो. काही देशांमध्ये तर अशा चिप्सची चाचणी सुरूही झाली आहे. आपल्याला पाकीट, कार्ड, अगदी मोबाईलही बाळगण्याची गरज नाही. फक्त आपल्या ओळखीनेच (रेकग्निशन) व्यवहार होणार! ॲप्सचा उद्योग तर प्रचंड वेगाने वाढत आहे. खरेदी, बिले भरणे, गुंतवणूक, कर्ज घेणे सर्व काही ॲप्समधून होत आहे. त्यामुळे व्यापार, विपणन आणि ग्राहक सेवा यांचे स्वरूप पूर्णपणे बदलत आहे. आठवड्याचे सातही दिवस २४ तास सेवा ही आता अपेक्षा बनली आहे. जैविक ओळख तंत्रज्ञान (बायोमेट्रिक) म्हणजे बोटांचे ठसे, चेहऱ्याची ओळख, डोळ्यांचे स्कॅन यांचा वापर वाढत आहे. यामुळे व्यवहार अधिक सुरक्षित होत आहेत. आज अनेक मोबाईलमध्ये बोट ठेवून किंवा चेहरा दाखवून फोन उघडता येतो. उद्या कदाचित पैशांचा व्यवहारही अशाच पद्धतीने होईल. बँकिंग क्षेत्रातही मोठे बदल होत आहेत. व्यवसाय क्षेत्रात या बदलांचा मोठा प्रभाव पडत आहे. दुकानदार डिजिटल पद्धतीने पैसे स्वीकारत आहेत. या पद्धतीमुळे ग्राहकांना जलद सेवा मिळते, व्यवहारांची नोंद आपोआप राहते, त्यामुळे पारदर्शकता वाढते. छोट्या व्यवसायांनाही मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. शिक्षण क्षेत्रातही बदल दिसत आहेत. विद्यार्थी मोबाईलद्वारे फी भरतात, अभ्यासक्रम घेतात. त्यामुळे लहान वयातच आर्थिक व्यवहारांचे ज्ञान मिळते. डिजिटल साक्षरता वाढते. डिजिटल व्यवहारांमध्येही भारताने गेल्या काही काळात मोठी झेप घेतली. हे एक असे युग आहे, जिथे तंत्रज्ञानाचा वापर सर्व क्षेत्रात वाढत आहे. या युगात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे आपल्या जगण्याची आणि काम करण्याची पद्धत बदलत आहे. आता अशी बरीचशी कामे 'ऑनलाईन' होऊ घातल्याने येत्या फक्त १० ते २० वर्षांमध्ये आपल्याला कल्पनाही करता येणार नाही, इतक्या बाबी संगणकाद्वारे हाताळता



येणार आहेत. परंतु या सगळ्या सोयींसोबत काही आव्हानेही आहेत. सर्वात मोठा प्रश्न म्हणजे सुरक्षितता. फसवणूक, बनावट संदेश, ओटीपी चोरणे या गोष्टी वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने सतर्क राहणे गरजेचे आहे. आपली माहिती सुरक्षित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच समाजात डिजिटल दरी ही समस्या आहे. तरुण पिढी तंत्रज्ञान सहज वापरते, पण वृद्धांना अडचणी येतात. त्यामुळे सर्वांना तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिक डिजिटल व्यवहार समजू शकेल असे वातावरण तयार करणे गरजेचे आहे. एक महत्त्वाची बाब म्हणजे खर्चाची जाणीव. पूर्वी आपण नोटा मोजून खर्च करीत असल्याने व्यवहारावर नियंत्रण राहायचे. आता मोबाईलद्वारे सहज पैसे जातात. त्यामुळे कधी कधी अपेक्षेपेक्षा जास्त खर्च होतो. आर्थिक शिस्त राखणे आवश्यक आहे.

भविष्यात आवाजाने व्यवहार करणे, हाताच्या हालचालीने पैसे देणे अशा नवीन पद्धती येऊ शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या खर्चावर लक्ष ठेवेल, सल्ला देईल, बचत वाढवेल. 'येरे येरे पावसा, तुला देतो ई-पैसा' ही ओळ एका नव्या युगाची सुरुवात दर्शवेल. पैसा दिसणार नाही, पण तो प्रत्येक ठिकाणी असेल. आपल्या मोबाईलमध्ये, आपल्या ओळखीत, आपल्या प्रत्येक व्यवहारात. पाकीट हरवले तरी नुकसान होणार नाही, पण आपली डिजिटल ओळख सुरक्षित ठेवणे सर्वात महत्त्वाचे ठरेल. तंत्रज्ञानाने आपले जीवन सुलभ केले आहे, पण त्याचा योग्य वापर करणे आपल्या हातात आहे. म्हणूनच या नव्या युगाला स्वीकारून, त्याचा योग्य उपयोग करून, सुरक्षित आणि सजग राहून पुढे जाणे हेच शहाणपणाचे आहे. एकंदरीत, कालाय तस्मै नमः काळाच्या या प्रवाहाला अभिवादन करून, डिजिटल भविष्याचा आत्मविश्वासाने स्वीकार करायला हवा. परिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे आणि या परिवर्तनाशी जुळवून घेणाराच उद्याचा विजेता असेल. ▮

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वाचक पत्रे

### विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी खेळ

नीट प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. नीटसारख्या महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेचा पेपर फुटणे ही बाब चिंतनीय आहे. परीक्षा रद्द झाल्याने अंदाजे १० लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. गेली दोन वर्षे रात्रीचा दिवस करून परीक्षा देणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना या निर्णयाचा मोठा फटका बसणार आहे. भ्रष्ट व्यवस्था आणि काही लोकांनी केलेल्या चुकीची शिक्षा लाखो गुणी आणि मेहनती विद्यार्थ्यांना मिळणार आहे. काहीही चूक नसताना या विद्यार्थ्यांना याचा मनस्ताप सहन करावा लागत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून नीटच्या परीक्षेची तयारी केली होती. परीक्षा चांगली गेल्याने चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल या आशेवर असणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा मोठा मानसिक ताण येणार आहे. खेडेगावातून शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना आणखी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. त्यांना पुन्हा शहरात जाऊन राहणे, वसतिगृहाचा खर्च करणे, क्लासेस, टेस्ट सिरिज यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थीच नाही तर पालकही चिंतेत आहेत. दोन वर्षांची मेहनत सफल झाली असे वाटत असतानाच पुन्हा परीक्षा देण्याची वेळ आल्याने विद्यार्थ्यांवर मानसिक ताण आला आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

### त्यांनी राज्यात येता कामा नये

पश्चिम बंगालमध्ये अपेक्षित परिवर्तन झाले. ममता बॅनर्जी केवळ या रोहिंग्यांच्या मतांवरच निवडून येत होती, हे स्पष्ट झाले आहे. आता भाजपा सरकार व मुख्यमंत्री शुभेन्दु अधिकारी लवकरच या रोहिंग्यांना बांगला देशात वापस पाठवणार. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ज्या ज्या भागात विशिष्ट धर्माचे लोकं मोठ्या प्रमाणात राहतात तेथे चौकशी, पाळत ठेवणे गरजेचे आहे. नागपूरसारख्या ठिकाणी सर्व्हे झाला पाहिजे. २०११ नंतर गेल्या १४ वर्षांत किती लोकं बाहेरून आले व ते नेमके काय करीत आहेत, याची माहिती पोलिस विभागाजवळ असलीच पाहीजे. भारतातील प्रत्येक राज्याने आपल्या सीमेवर विशेष निगराणी ठेवली पाहीले. घुसखोर बांगला देशी हे त्यांच्याच देशात वापस जायला हवे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

### चोराच्या उलट्या बोंबा

काँग्रेस शासन काळात, विशेषतः राजस्थानात बऱ्याच स्पर्धा परीक्षांची पेपरफूट प्रकरणे घडली. २०२० मधील 'वनरक्षक भरती बाडमेर' परीक्षेच्या पेपरफूट प्रकरणात एनएसयुआयचा माजी अध्यक्ष नरेश देव सारणला अटक झाली होती. २०२१ मध्ये झालेल्या शिक्षक भर्ती परीक्षेतील घोटाळ्यात बऱ्याच काँग्रेसजनांचा सहभाग होता. नीट-२०२६ परीक्षा सुरक्षित होण्यासाठी विविध उपाय करण्यात आले होते. इतकंच काय, प्रश्नपत्रिका वाहून नेण्यासाठी जीपीएस ट्रॅक्ड वाहनांची सोयसुद्धा होती. इतके सगळे करूनही पेपर फुटलाच. पेपरफूट समर्थनीय नाहीच. यातले झारीतले शुक्राचार्य शोधून शासनाने त्यांना धडकी बसेल अशी शिक्षा करावी.

**कल्पना माहुरकर**/नागपूर

●● ●●

### विशेष गाड्या वेळेवर धावाव्यात

कधी कधी विशेष गाड्यांना पाच ते सहा तासांचा विलंब होतो. भाडेही जास्त असते, मग विशेष गाड्यांना इतका उशीर का होतो? रेल्वे विभाग जर कोणत्याही विशेष गाड्या चालवत असेल, तर त्यांनी सर्वप्रथम त्या गाड्या वेळेवर धावतील, याची खात्री करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. उदाहरणार्थ, जर एखादी विशेष गाडी धावत असेल, तर कोणत्याही सुपरफास्ट गाडीने त्या गाडीला ओव्हरटेक करू नये. दुरंतो एक्सप्रेस आणि राजधानी एक्सप्रेस वगळता इतर कोणत्याही गाडीने विशेष गाडीला ओव्हरटेक करू नये. कारण त्यांचे भाडे जास्त असते. अनेकदा असे दिसून येते की, विशेष गाड्यांमध्ये पाण्याची कमतरता असते, ज्यामुळे प्रवाशांची गैरसोय होते. प्रत्येक प्रमुख स्थानकावर पाणीपुरवठ्याची तपासणी केली पाहिजे. विशेष गाड्यांमधील स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे. कारण गाड्यांमध्ये वारंवार चोऱ्या होतात. रेल्वे विभाग याकडे लक्ष देईल का?

**राजेश कारिया**/अकोला

●● ●●

### उन्हाळ्याला हलक्यात घेऊ नका

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाच्या तीव्र झळा त्रासदायक ठरत आहेत. उन्हात फिरल्याने पटकन थकवा येतो, चक्कर येतात, हातापायाला गोळे येतात, डोळ्यांना भयंकर त्रास होतो, कानात व नाकात उन्हाच्या झळा शरीरात प्रवेश करतात. याचे प्रमाण वाढले की, उष्माघाताची शक्यता असते. मेंदू व हृदयावर या वाढत्या उन्हाचा विपरीत परिणाम होतो. उन्हाळ्यात शरीराचे तापमान उच्च पातळीवर जाते. यामुळे उन्हात फिरणे, श्रमाची कामे करणे टाळावीत. गरजेचेच असेल तर कान, नाक व डोके हे पूर्णपणे कापडाने झाकावे. पांढरे व सैल कपडे वापरावे, भरपूर पाणी प्यावे. उन्हाळ्याला हलक्यात घेऊ नका. ▮

**धोंडीरामसिंह राजपूत**/वैजापूर ९४२१३१२२४४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# बीड बसस्थानक आहे की चोरांचा अड्डा?

## महिलेच्या पर्समधून आठ लाखाचे सोने चोरीला; प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण



**बीड ( प्रतिनिधी)** | बीड शहरातील बसस्थानक परिसरात दिवसाढवळ्या महिलेच्या पर्समधून लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना गुरुवारी (दि. 14 मे) दुपारी घडली. या घटनेमुळे बसस्थानक परिसरात एकच खळबळ उडाली असून प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सविता दत्तात्रय ढगे (रा. कासार जवळा, ता. जिल्हा लातूर) या जालना येथे जाण्यासाठी बीड बसस्थानकात आल्या होत्या. दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास त्या बसस्थानकात थांबल्या होत्या. सायंकाळी 4:15 वाजता बस आल्यानंतर बसमध्ये चढताना त्यांनी पर्स तपासली असता त्यामधील सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

चोरी झालेल्या दागिन्यांमध्ये मिनी गंठण, तीन अंगठ्या, कानातील झुमके असा जवळपास सात तोळे सोन्याचा ऐवज होता. या दागिन्यांची किंमत अंदाजे आठ ते दहा लाख रुपये असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, बीड बसस्थानकातील पोलीस चौकी गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असल्याने बसस्थानक परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा नसल्याने चोरट्यांचे फावले असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

तसेच, शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, "डीबी पथक फक्त नावालाच आहे का?" असा सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या घटनेमुळे बसस्थानक परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी तातडीने सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे.

### बसस्थानकातील पोलीस चौकी अनेक महिन्यांपासून बंद

दरम्यान, बीड बसस्थानकातील पोलीस चौकी गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असल्याने बसस्थानक परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा नसल्याने चोरट्यांचे फावले असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य : नगर परिषदेकडून परळीत मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा प्रदान ; आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते जागा हस्तांतरित !



परळी वैजनाथ, प्रतिनिधी...

परळी वैजनाथ शहरात मराठा भवन उभे राहावे अशी गेल्या अनेक वर्षांपासून ची सकल मराठा समाजाची मागणी होती. ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदे कडून मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा देण्यात आली आहे. स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधत आज माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण करत ही जागा मराठा भवनसाठी हस्तांतरित करण्यात आली आहे.

वैद्यनाथ मंदिर परिसरात नंदागौळ रस्त्यावर वेताळ मंदिराच्या बाजूला असलेली २८ गुंठे जागा नगरपरिषदेकडून मराठा भवनसाठी नियोजित करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून परळी मध्ये मराठा भवन असावे अशी मराठा समाजाची आग्रही मागणी होती. आता मराठा भवनसाठी ही जागा हस्तांतरित करण्यात आली आहे. लवकरात लवकर सुसज्ज मराठा भवन उभे राहील अशी भूमिका मराठा समाज बांधवांनी व्यक्त केली. या अनुषंगाने आज संबंधित ही २८ गुंठे जागा माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते हस्तांतरित करण्यात आली. यावेळी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन व नियोजित मराठा भवनच्या नाम फलकाचे अनावरण आ.धनंजय मुंडे, नगराध्यक्ष सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी परळीत देखणे मराठा भवन उभे राहील असा विश्वास मराठा समाज बांधवांनी व्यक्त केला. मराठा भवनसाठी ही जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल सकल मराठा समाजाच्या वतीने आमदार धनंजय मुंडे व नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. सकल मराठा समाजाच्या वतीने परळी नगर परिषदेचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

मराठा भवन मध्ये काय आहे प्रस्तावित?

दरम्यान,सकल मराठा समाजाच्या वतीने परळी येथे उभारण्यात येणाऱ्या मराठा भवन मध्ये समाज उपयोगी उपक्रम राबवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुला मुलींचे वसतीगृह, शिकवणी क्लासेस, अभ्यासिका, नोकरी मार्गदर्शन केंद्र आदी विद्यार्थी कलागुण विकसित करण्यासाठीचे उपक्रम या भवन मधून राबवण्यात येणार आहेत. उद्योग, व्यवसाय मार्गदर्शन, व्यवसायातील बारकावे, येणारी आव्हाने, उद्योजक, व्यावसायिकांचे परिचय मेळावे आदी आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वधू-वर परिचय मेळावे, सामूहिक विवाह कार्य, शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक, सामाजिक ,व्यावसायिक यासह अनेक विषयावर प्रबोधन मार्गदर्शन मिळावे आयोजित करण्यासाठी मराठा भवन उपयुक्त ठरणार आहे. सर्व गुणसंपन्न पिढी घडविण्याच्या दृष्टिकोनातून ही वास्तू एक महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याचा संकल्प मराठा भवनच्या उभारणीत करण्यात आलेला आहे.

# श्री छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा 89.71% निकाल

बीड (प्रतिनिधी):- जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, श्री छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत उज्वल निकालाची परंपरा कायम राखत विद्यालयाचा ८९.७१ टक्के निकाल लागला आहे. श्री छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयातून विशेष प्राविण्य ३३ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ३८ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत १८ तर तृतीय श्रेणीत ०७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. विद्यालयातून सर्व प्रथम सानिका विनोद नलावडे हिने (८९.२०%), सोनाली बालासाहेब चौरे (८८.२०%), अंजली संतोष कोठेकर (८८.००%),कार्तिक महादेव बादाडे (८७.२०%), स्नेहल रामराव गायकवाड (८७.२०%), आस्था संजय राठोड (८७.२०%), श्रेया संतोष काळे (८६.००%), समर्थ श्रीकिसन पुरी (८५.६०%) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

# पत्रकार महेश वाघमारे यांना मातृशोक



**बीड/प्रतिनिधी** | जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे यांच्या मातोश्री श्रीमती मालतीबाई माधवराव वाघमारे वय 88 वर्ष यांचे दि.14 मे 2026 रोजी बीड येथील निवासस्थानी दि 14 रोजी पहाटे 4 वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाच वाजता बीड येथील अमरधाम मध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी नागरिक,नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीमती मालतीबाई माधवराव वाघमारे या मूळ राहणार अंबड येथील असून त्यांच्या पश्चात दोन मुले,सुना नातवंडे असा परिवार आहे. जुन्या पिढीतील धार्मिक वृत्तीच्या श्रीमती मालतीबाई वाघमारे अंबड मध्ये मनमिळाऊ स्वभावाच्या म्हणून परिचित आहेत.

काही महिन्यापूर्वीच मोठे चिरंजीव प्रसिद्ध निवेदक स्व मंगेश वाघमारे यांचे निधन झाले,त्यांनतर त्या बीड येथे पत्रकार महेश वाघमारे यांच्या निवासस्थानी राहत होत्या.गुरुवारी अचानक पहाटेच त्यांची प्राणज्योत मालवली,निधनाचे वृत्त कळताच वाघमारे यांच्याकडे अनेकांनी सांत्वन भेट दिली.

# श्री शनैश्वर जन्मोत्सव व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थी गुणगौरव व रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | श्री शनैश्वर जन्मोत्सव व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री शनी मंदिरात १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व रक्तदान शिबिर मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले.

श्री वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री शनैश्वर जन्मोत्सवाचे आयोजन रविवार (दि.१०) पासून करण्यात आले आहे. यानिमित्ताने गुरुवारी (दि. १२) छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १० वी १२ वी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवानेते जयराज देशमुख, भाजपचे युवानेते अश्विन मोगरकर, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवा लांडगे, विश्वस्त रघुनाथ भाग्यवंत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज व विरशैव लिंगायत समाजाचे आराध्य दैवत श्री मन्मथस्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

श्री शनैश्वर जन्मोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेतील महापुरुषांच्या वेशभूषा स्पर्धेत प्रथम समर्थ पिंपळे, द्वितीय शशीकला उदगीरकर, तृतीय अजंत चौधरी व उत्तेजनार्थ ईशान उदगीरकर यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यानंतर तेली समाजातील १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा प्रविण फुटके व आभार उत्तम साखरे तर सुत्रसंचलन शुभांगी साखरे व सिमा साखरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा मधुकर शिंदे,शिवराज सोनटक्के, शिवशंकर जठार, अतुल बेंडे, उत्तम साखरे, चंद्रशेखर फुटके, अशोक पिंपळे, सोमनाथ वाघमारे, रवी अन्नपुर्णे, दिपक साखरे, प्रेम जठार, प्रसाद जठार यांच्यासह श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्ट, श्री शनैश्वर प्रतिष्ठान, तेली युवक संघटना, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, श्री शनैश्वर महिला मंडळाच्या युवक, महिलांनी प्रयत्न केले तर बुधवारी शांभवी क्लिनीकल लॅबच्या वतीने दिपक साखरे यांनी आयोजित केलेल्या मोफत रक्ततपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ३०० वर भाविकांची मोफत रक्ततपासणी करण्यात आली.

रक्तदान शिबीरात युवक व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री शनी मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास महिला, युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. यामध्ये ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

# तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना 29 मेपर्यंत न्यायालयीन कोठडी

**बीड प्रतिनिधी** | बीड जिल्ह्यातील बहुचर्चित भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणात अटक करण्यात आलेले तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना शुक्रवारी जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर न्यायालयाने त्यांना २९ मेपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावत कारागृहात रवानगी करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणात १५४ लवाद आदेशांच्या माध्यमातून तब्बल २४१ कोटी ६२ लाख रुपयांचा वाढीव मावेजा मंजूर करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. या घोटाळ्याप्रकरणी उपजिल्हाधिकारी भूसंपादन सतीश धुमाळ यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली होती.

त्यानुसार महसूल विभागातील अधिकारी, कंत्राटी कर्मचारी तसेच काही वकिलांसह एकूण दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान एसआयटीकडून तांत्रिक पुरावे, संगणकीय नोंदी आणि कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. या तपासातून तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचा सहभाग समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे.

यानंतर गुरुवारी रात्री लातूर येथून त्यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली होती. पुढील तपासासाठी न्यायालयाने त्यांना आठ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. या कालावधीत एसआयटीने संबंधित संचिका, लॅपटॉप, संगणक तसेच मोबाईल रेकॉर्डिंगची तपासणी केली. तसेच पाठक यांच्या आवाजाचे नमुनेही तपासासाठी घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

शुक्रवारी जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणीदरम्यान न्या. एस. आर. शिंदे यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर अविनाश पाठक यांना २९ मेपर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर केली. दरम्यान, या प्रकरणाचा तपास एसआयटीकडून सुरू असून भूसंपादन मावेजा घोटाळ्यात आणखी काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# काटकसर हीच खरी देशभक्ती – पंतप्रधानांच्या आवाहनाला जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा- शंकर देशमुख

## भाजपा जिल्हाध्यक्षांचे नागरिकांना आवाहन



बीड, प्रतिनिधी : जागतिक स्तरावर निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती, वाढते इंधन संकट आणि बदलती आर्थिक परिस्थिती लक्षात घेता देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना काटकसर, इंधन बचत आणि राष्ट्रीय जबाबदारीचे भान राखण्याचे महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. हे आवाहन कोणत्याही प्रकारची भीती निर्माण करण्यासाठी नसून भविष्यात देशासमोर कोणतीही अडचण किंवा संकट निर्माण होऊ नये, यासाठी खबरदारीचा आणि दूरदृष्टीचा उपाय म्हणून करण्यात आले असल्याचे भारतीय जनता पार्टी बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी म्हटले आहे

प्रसिद्धीत दिलेल्या पत्रकात श्री देशमुख यांनी म्हटले आहे की देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत पंतप्रधानांनी स्वतःच्या ताफ्यात कपात करून आदर्श निर्माण केला असून महाराष्ट्र शासनानेही मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्र्यांचे व अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द करून जबाबदारीची भूमिका घेतली आहे. शासन आणि प्रशासन स्वतःपासून काटकसरीची सुरुवात करत असल्यामुळे सामान्य नागरिकांनीही यात सहभागी होणे ही काळाची गरज आहे.

ही वेळ राजकारण करण्याची नसून देशहितासाठी एकत्र उभे राहण्याची आहे.

पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाकडे विरोधकांनी केवळ राजकीय दृष्टिकोनातून न पाहता राष्ट्रहित, आर्थिक स्थैर्य आणि भविष्यातील सुरक्षिततेच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. देशाच्या हितासाठी घेतलेल्या खबरदारीच्या उपायांमध्ये सर्वांनी सहकार्य करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे.

भारतीय जनता पार्टीचा बीड जिल्हाध्यक्ष म्हणून मी बीड जिल्ह्यातील तमाम नागरिकांना आवाहन करतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या या सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण आवाहनाला प्रतिसाद देऊन राष्ट्रहिताच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनानुसार नागरिकांनी पुढील बाबींवर विशेष भर द्यावा –

* इंधनाचा अनावश्यक वापर टाळावा * सार्वजनिक वाहतुकीचा जास्तीत जास्त वापर करावा * वीज बचतीला प्राधान्य द्यावे * अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावे * स्वदेशी आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे * सामाजिक ऐक्य, शिस्त आणि संयम राखावा * देशाच्या सुरक्षेबाबत जागरूक राहावे

आज प्रत्येक भारतीयाने "देश प्रथम" ही भावना मनात ठेवून पुढे येण्याची गरज आहे. बीड जिल्ह्यातील जनतेने नेहमीच राष्ट्रहिताच्या प्रत्येक उपक्रमात सकारात्मक सहभाग घेतला आहे. याही वेळी बीड जिल्हा देशासाठी आदर्श निर्माण करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

"राजकारणापेक्षा राष्ट्रकारण मोठे" — या भावनेतून सर्वांनी पंतप्रधानांच्या दूरदृष्टीपूर्ण आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन देशहितासाठी एकजूट दाखवावी, हेच आजचे खरे राष्ट्रीय कर्तव्य आहे. असं शंकर देशमुख यांनी प्रसिद्ध पत्रकार म्हटले आहे.

# माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी - विक्री करणा-यांवर कारवाई होणार : सभापती जयदत्त नरवडे



माजलगाव, प्रतिनिधी: शेतक-यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी - विक्री करणा-यांवर कारवाई होणार असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 व नियम 1967 अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी - विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. परंतु तालुक्यातील काही ग्रामीण भागात अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी - विक्री करत असल्याचा प्रकार घडत आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार आहे. माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने यासंदर्भात परिपत्रक जाहिर केले असून संबंधितांना वेळोवेळी सुचना देवुनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी - विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. मा.पणन संचालक यांचे दि. 08 मे 2026 व मा. जिल्हा उपनिबंधक कार्यालय बीड यांचे पत्र दि. 11 मे 2026रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विना परवाना शेतीमाल खरेदी - विक्री करणा-या व्यापा-यांवर कारवाई करण्याचा ईशारा बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी दिला आहे.

# यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त व आत्मविश्वास आवश्यक : राजकिशोर मोदी

## श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव



**अंबाजोगाई** | बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून सामाजिक बांधिलकी जोपासत इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बुधवारी गुणगौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी म्हणाले की, विद्यार्थ्यांना यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त व आत्मविश्वास आवश्यक आहे. अपयशाला न घाबरता पुढील ध्येय निश्चित करून चिकाटीने प्रयत्न केल्यास निश्चित यश मिळते, असे ही ते म्हणाले. तसेच पालक व शिक्षकांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग अधिक सुलभ होत असल्याचेही त्यांच्याकडून सांगण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रात अंबाजोगाई शहराचे नांव महाराष्ट्रात उंचावण्याचे काम यावर्षी ही गुणवंत विद्यार्थ्यांनी केले आहे. या विद्यार्थ्यांचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. अंबाजोगाई शहराच्या शैक्षणिक वैभवात भर टाकण्याचे काम श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ सातत्याने करीत आहे. या संस्थेच्या माध्यमातून अंबाजोगाई शहर व तालुक्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. याकरिता विविध प्रकारच्या शैक्षणिक सोयी, सुविधा आणि नव्या जगात पुढे जाण्यासाठी आवश्यक असलेले अभ्यासक्रम आपण विद्यार्थ्यांना शिकवत आहोत. शहरातील श्री योगेश्वरी शिक्षण संस्था, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था यांच्यासह सर्वच शैक्षणिक संस्था अतिशय उत्तम काम करीत आहेत. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून सामाजिक बांधिलकी जोपासत आज आपण इयत्ता १० वी आणि १२ वी वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करीत आहोत. या विद्यार्थ्यांचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो आहे असे संस्थापक सचिव मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई शहर व स्थानिक परिसरातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव बुधवार, दिनांक १३ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा व यशाचा गौरव करण्यासाठी अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मिटींग हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास अंबाजोगाई श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, मार्गदर्शक प्रा.वसंतराव चव्हाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तसेच यावेळी गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रीमती अंजली संजय लोहिया (मुख्याध्यापक, बालनिकेतन विद्यालय, अंबाजोगाई) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तर उपस्थित गुरूजणांचे स्वागत करण्यात आले. यानंतर खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे आदित्य जिजाराम कावळे (१०० टक्के), ऋत्विज दत्तात्रय कुलकर्णी (१०० टक्के), कौस्तुभ ज्ञानेश मातेकर (९९.६० टक्के) तसेच जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयाचे सृष्टी तुकाराम खरटमोल (९४.२० टक्के), रेणुका कैलास मंगे (९१.२० टक्के), श्रावणी अमोल हारे (९०.८० टक्के), अजित संजय पवार (८६.८० टक्के), रितेश लक्ष्मण काळे (८६ टक्के), साक्षी विजय आदमाने (८४.४० टक्के), समिक्षा विलास लोखंडे (८४ टक्के), निरजा बाबासाहेब ढवारे (८२ टक्के), साक्षी सुशील चव्हाण (८२ टक्के), श्रावणी इंद्रजित कुसळे (८२ टक्के), जोधाप्रसादजी मोदी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विज्ञान शाखेतील सिध्दी भुषण मोदी (प्रथम), वरद अनंत केंद्रे (द्वितीय), जानकी जयस्वाल (तृतीय) तसेच जोधाप्रसादजी मोदी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कला शाखेतील बुशरा इब्राहिम परसुवाले (प्रथम), सादील मोहम्मद गवळी (द्वितीय), रामेश्वरी चंद्रकांत गायके (तृतीय) या गुणवंत विद्यार्थ्यांचा फेटा बांधून आणि शाल, पुष्पगुच्छ देऊन गुणगौरव करण्यात आला. यावेळी पालक आणि विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विनायक मुंजे यांनी केले. तर सुत्रसंचालन राजेश कांबळे यांनी करून उपस्थितांचे आभार आंबाड सर यांनी मानले. यावेळी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भुषण मोदी, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, पत्रकार ज्ञानेश मातेकर, राजेश कांबळे, नाना गायके, कैलास मंगे, दत्तात्रय कुलकर्णी, नीना सोनवणे, अश्विनी उगीले, मेघा अकोलकर, वर्षा गुळवे, राजाभाऊ होके, रामेश्वर माले, बुधाजी खरात, रामचंद्र कागणे, गजानन मुळे, रामचंद्र इंगळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# संभाव्य एल-निनोच्या पार्श्वभूमीवर टंचाई निवारण उपाययोजना राबवा- जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ मे**

संभाव्य एल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण व पाणीटंचाई निवारण उपाययोजना तातडीने कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आयोजित आढावा बैठकीत दिले.

संभाव्य एल-निनो प्रभावाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, सर्व उपविभागीय अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नगरपालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त, जिल्हा जलसंधारण अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता तसेच जलसंपदा विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जलयुक्त शिवार, सीसीटी, डीपसीसीटी, गॅबीयन बंधारे, नाला खोलीकरण, रिचार्ज शॉफ्ट, ढाळीचे बांध आदी जलसंधारणाची प्रस्तावित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. कामात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात सध्या टंचाईग्रस्त गावांमध्ये तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून २० बोअरवेल व २६ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. जलजीवन मिशनअंतर्गत प्रलंबित विद्युत जोडणीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलयुक्त शिवाराची कामे, वृक्षलागवड, भूजल पातळी तपासणी तसेच बियाणे व खताचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्यावर भर देण्यात आला. पुढील १५ दिवसांत टंचाई भासू शकणाऱ्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. याशिवाय, इसापूर, सिद्धेश्वर, येलदरीसह विविध धरणांतील उपलब्ध पाणीसाठ्यात पिण्याच्या पाण्यास प्राधान्य द्यावे, प्रत्येक शासकीय कार्यालय परिसरात पावसाचे पाणी साठवण व्यवस्था करावी तसेच सर्व कामांचे जीओ-टॅग फोटो अपलोड करणे बंधनकारक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

खत विक्रेत्यांनी खत लिंकिंग होत नसल्याबाबतचे फलक व हेल्पलाईन क्रमांक दर्शनी भागात लावावेत तसेच खतसाठा व दैनंदिन वापराचा नियमित आढावा घ्यावा. पशुधनासाठी संभाव्य चाराटंचाई टाळण्यासाठी आवश्यक चारा नियोजन करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी गुप्ता यांनी बैठकीत दिल्या.

# सीसीटीएनएस प्रणालीत हिंगोली पोलस घटक राज्यात प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ मे**

डॉ. नीलाभ रोहन पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलिस स्टेशनचे कामकाज ऑनलाईन चालते. त्यामध्ये तक्रारदार यांची तक्रार घेवुन ती ऑनलाईन करुन गुन्हा दाखल केल्या जातो व त्या गुन्ह्याचा सर्व तपास हा वेळे मध्ये सीसीटीएनएस प्रणाली मध्ये भरण्यात येतो. तसेच या प्रणाली द्वारे आरोपींचा पूर्व इतिहास पडताळून त्यांचेवर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येतात. हिंगोली जिल्हयामध्ये सीसीटीएनएस नोडल अधिकारी म्हणुन अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना हे कामकाज पाहतात. कमलेश मीना यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला सीसीटीएनएस कामकाज करण्यासाठी एक किंवा दोन अंमलदार यांची सीसीटीएनएस पर्यवेक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आली असुन सदर पर्यवेक्षक अंमलदार यांच्या कामकाजाकडे लक्ष देण्यासाठी सीसीटीएनएस देखरेख अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे. सदर सीसीटीएनएस देखरेख अधिकारी व सीसीटीएनएस पर्यवेक्षक यांना प्रत्येक महिन्याला सीसीटीएनएस शाखा येथे कार्यरत असलेले हेडकॉन्स्टेबल राजु पांडुरंग हमाने, अंमलदार राहुल तडकसे, महिला पोलीस अंमलदार पुजा जाधव यांचे मार्फत सीसीटीएनएस कार्यप्रणाली तसेच सदर प्रणालीशी निगडित असलेले सर्व प्रकारचे पोर्टल जसे सीसीटीएनएस, आयसीजेएस, आयटीएसएसओ, क्रायमॅक व इतर प्रकारचे पोर्टलबाबत सविस्तर मार्गदर्शन करुन प्रशिक्षण दिल्या जाते तसेच प्रणालीशी निगडित असलेल्या सर्व प्रकारच्या अडीअडचणी तात्काळ सोडवल्या जातात व सर्व पर्यवेक्षक यांना वेळोवेळी कामकाज करुन घेण्याकरिता पाठपुरावा करण्यात येतो. त्यामुळे जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनचे कामकाज सुरळीत चालते.

प्रत्येक महिण्याला गुन्हे अन्वेशन विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे हे महाराष्ट्र राज्यातील ५३ घटकांच्या उउढछड कामगिरी बाबतच आढावा घेवुन दर महिण्याला प्रत्येक घटकाला गुणांकण देते. फेब्रुवारी २०२६ महिण्यात हिंगोली घटकाला उउढछड कामगिरीमध्ये २०१ पैकी २०१ गुण मिळाल्याने हिंगोली जिल्हयाची १००% कामगिरी असल्याने हिंगोली जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळाला आहे.

पोलिस अधीक्षक नीलाभ रोहन व कमलेश मीना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक मोहन भोसले व स.पोलीस निरिक्षक शिवसांब घेवारे तसेच सीसीटीएनएस शाखा, हिंगोली येथे जिल्हयाचे सीसीटीएनएस स्पोक म्हणुन कार्यरत असलेले पोलीस हेडकॉन्स्टेबल राजु पांडुरंग हमाने, पोलीस अंमलदार राहुल तडकसे, महिला पोलीस अंमलदार पुजा सखाराम जाधव तसेच जिल्ह्यातील सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी, सीसीटीएनएस देखरेख अधिकारी, सीसीटीएनएस पर्यवेक्षक/अंमलदार केशव पुंड, सुमन काळे, राम धुमाळ, गजानन शिंदे, भारत डाखुरे, केतन तायडे, पुजा पवार, अमोल अडकिणे, राहुल राठोड, मंगेश नरवाडे, लक्ष्मण हगवणे, मीना सानप, विश्वनाथ दळवे, सिता पोले, नामदेव जाधव, रमेश बोरकर या सर्वांनी वेळेत सीसीटीएनएस कामकाज केल्याने माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये महाराष्ट्रात हिंगोली जिल्हा पहीला आलेला आहे. सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये हिंगोली जिल्ह्याची कामगिरी ही उल्लेखनीय आहे.

# आजपासून पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानांतर्गत भाजपची दोन दिवशीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ मे**

भारतीय जनता पक्षाच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६ अंतर्गत हिंगोली जिल्हास्तरीय दोन दिवसीय निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. १६ व १७ मे रोजी शहरातील हॉटेल शांती येथे ही कार्यशाळा पार पडणार आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचा प्रारंभ होणार आहे. समर्थ कार्यकर्ता सशक्त संघटना संकल्पनाया निवासी कार्यशाळेचा मुख्य उद्देश पक्षाची विचारधारा, संघटनात्मक बांधणी आणि केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा तळागाळातील लोकांपर्यंत प्रभावी प्रसार करणे हा आहे. समर्थ कार्यकर्ता सशक्त संघटना या संकल्पनेवर ही कार्यशाळा आधारित आहे. वरिष्ठ नेत्यांचे लाभणार मार्गदर्शनदोन दिवसीय प्रशिक्षणात विविध सत्रांमध्ये कार्यकर्त्यांना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यामध्ये माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, विधान परिषद सदस्य प्रा. संजय भेंडे, मराठवाडा संयोजक मनोज पांगरकर, प्रदेश सचिव प्रविण घुगे, माजी जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा, प्रदेश प्रवक्ता लक्ष्मणराव सावजी, प्रदेश प्रवक्ता विनोद वाघ, भाजप नेते किरण पातुरकर यांचा समावेश आहे. या कार्यशाळेला खासदार रामराव वडकुते, जिल्हा प्रभारी संजय कौडगे, आमदार तान्हाजीराव मुटकुळे, आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव,माजी आ.जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हा संयोजक फुलाजीराव शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष बाबाराव बांगर, अतिश दांडेगावकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.चित्र व माहिती फलकांचे प्रदर्शन कार्यशाळेच्या निमित्ताने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा जीवनप्रवास, त्यांचा एकात्म मानववाद आणि अंत्योदय विचार मांडला जाणार आहे. तसेच भारतीय जनसंघापासून ते आजच्या भाजपपर्यंतचा ऐतिहासिक प्रवास, केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना आणि हिंगोली जिल्ह्यात झालेल्या विकासकामांची माहिती चित्रांच्या व माहिती फलकांच्या प्रदर्शनातून मांडली जाणार असल्याची माहिती जिल्हा संयोजकांनी यांनी दिली.

# नमो उद्यानाचे नगराध्यक्षांचे हस्ते भूमीपूजन, १ कोटी निधी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ मे**

नगरपालिकेच्या निवडणूक काळात दत्त गल्ली आणि मंगळवारा बाजार परिसरातील नागरिकांना दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी येथील पाण्याच्या टाकीखालील मोकळ्या जागेत उभारण्यात येत असलेल्या 'नमो उद्याना'चे भूमिपूजन नगराध्यक्षा रेखाताई श्रीराम बांगर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. नगर उद्यान योजनेअंतर्गत सुमारे एक कोटी रुपये खर्चून हे उद्यान साकारले जाणार आहे.

मंगळवारा बाजार आणि दत्त गल्ली परिसरातील नागरिकांनी निवडणूक काळात दोन प्रमुख मागण्या केल्या होत्या. यात मंगळवारा बाजार पुन्हा मूळ जागेत भरवणे आणि पाण्याच्या टाकीखालील जागेत उद्यान विकसित करणे, यांचा समावेश होता. नगराध्यक्षा रेखाताई बांगर यांनी हे आश्वासन पूर्ण केले असून, यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. या उद्यानामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र फिरण्याची आणि बसण्याची व्यवस्था, लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी, तसेच आरोग्यासाठी 'ओपन जिम' यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी शिवसेना गटनेते नगरसेवक श्रीराम बांगर, सुभाष बांगर, गणेश बांगर, रवींद्र वाढे, खली बांगर, संदीप बांगर, विशाल गोटारे, रामकिसन बांगर, गुड्डू बांगर, नितीन बांगर, धनंजय मेथेकर, मोहनराव शार्दूल, सुधाकरराव रत्नपारखी, नागोराव देशपांडे, श्यामराव इटोलिकर, राजू मुंदडा, रवी मुंदडा, कृष्णराव जोशी, स्वप्नील सोनपावले यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिलेला शब्द पूर्ण केल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, या नमो उद्यानाचा स्थानिक नागरिकांनी आणि मुलांनी आरोग्यासाठी लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी नगराध्यक्षा रेखाताई बांगर यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त अभिवादन




हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार डी. एस. जोशी, सचिन जोशी, सी.आर.गोळेगावकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त शिवशंभो प्रतिष्ठानकडून गुणवंतांचा सत्कार

हिंगोली- धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवशंभो प्रतिष्ठानच्या वतीने इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी राजे उद्यान एनटीसी परिसरात गुरुवार दि.१४ मे रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवशंभो प्रतिष्ठानच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन पुजन करण्यात आले. यानंतर प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक डॉ.प्रकाश अंभोरे, प्रा.ज्योतीताई भिसे यांनी छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त मार्गदर्शन केले. यानंतर गुणवंत विद्यार्थी कौशिकी नर्सीकर, हर्षिता पराती, शेख महेक शेख महेबुब, श्रुती इंगळे , अक्षरा पंडित, स्वरा गलबले, शैलेश कोरडे, संकेत चव्हाण, नेतल शर्मा, अंशिता जैस्वाल, करुणा दाभाडे, प्रगती चोपडे, आर्पिता मनवर, वैभव इंगोले, अनुष्का कदम, नकुल गोटरे या गुणवंताचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला आहे. आभार प्रदर्शन माजी नगरसेवक तथा प्रतिष्ठानचे सदस्य सदाशिव सुर्यतळ यांनी केले. यावेळी कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर चव्हाण, डॉ.नामदेव कोरडे, शैलेश नांदेडकर, गोपाल सरनायक, विजय गुंडेकर, ज्योतीमाला धुळे, योगिता देशमुख, राधा बियाणी, नागनाथ लोखंडे, ॲड. किरण नर्सीकर यांच्यासह शिवप्रेमी महिला भगिनी, नागरिक आदींची उपस्थिती होती.

### ८० वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८० वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत ६९ हजार ४०० रूपयांचा दंड वसुल केला आहे.

# कर्तव्यात कसूर करणाऱ्या अंमलदारास केले निलंबीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ मे**

कळमनुरी पोलिस ठाणे हद्दीत डायल ११२ वर मदतीसाठी कॉल आला होता परंतु संबंधित पोलिस अंमलदाराने तब्बल दीड तासानंतर प्रतिसाद दिल्यामुळे पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी अंमलदारास तत्काळ निलंबीत करण्याचे आदेशदिले आहेत.

डॉ. नीलाभ रोहन हे कर्तव्य कठोर व कडक शिस्तीचे पोलीस अधीक्षक म्हणून ओळखले जातात त्यांनी हिंगोली जिल्हा पोलीस घटकातील प्रत्येक गोष्टीवर बारकाईने नियंत्रण ठेवून नागरिकांना जास्तीत जास्त चांगली सुविधा मिळवून देण्यासाठी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत. वेळ प्रसंगी कर्तव्यात कसूर करणाऱ्यां पोलिसांवर कठोर कार्यवाही केली आहे.

महाराष्ट्र पोलीस तर्फे नागरिकांना पोलिसांची तात्काळ मदत मिळण्यासाठी डायल ११२ ही सुविधा उपलब्ध करून दिली असून त्यावर पीडित व्यक्तीचा कॉल आल्यानंतर तात्काळ पोलीस मदत पाठवली जाते. तसेच कॉल आल्यानंतर कमीत कमी वेळात पोलीस मदत देते पोहोचली पाहिजे यावर पोलीस अधीक्षक यांचे बारकाईने लक्ष असते.

दि १२ मे २०२६ रोजी पोलीस स्टेशन कळमनुरी हद्दीत रात्री आठ वाजण्याची सुमारास डायल वन वन टू वर पोलीस मदतीसाठी कॉल आला असता कर्तव्यावरील पोलीस अंमलदार ६३९/ किशोर शंकर राठोड नेमणूक पोलीस स्टेशन कळमनुरी हे अगदी मर्यादित वेळेमध्ये सदर कॉलला प्रतिसाद देऊन पीडित व्यक्तीच्या मदतीसाठी जाणे अपेक्षित असताना त्यांनी तब्बल दीड तास उशीर केल्याने सदरची बाब पोलीस अधीक्षक सरांच्या लक्षात आली. त्यावरून डॉ.नीलाभ रोहन यांनी डायल ११२ कर्तव्यावरील पोलीस अंमलदार किशोर शंकर राठोड यांना त्वरित निलंबित केले आहे.

# विविध प्रकल्पांच्या भूसंपादन प्रक्रियेला गती द्या- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ मे**

जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांसाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, साठवण तलाव, उच्च पातळी बंधारे, लिगो प्रकल्प तसेच अन्य विकास कामांच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्रीमती मंजुषा मुथा, उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरोदे, सर्व उपविभागीय अधिकारी, भूमी अभिलेख विभागाचे जिल्हा अधीक्षक प्रशांत बिलोलीकर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या अनुषंगाने प्रलंबित असलेल्या भूसंपादन प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये जलसंपदा प्रकल्प, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, उच्च पातळी बंधारे, साठवण तलाव आदी प्रकल्पांतील प्रलंबित मावेजा वाटप, भूसंपादन मोजणी, लिगो प्रकल्पासंदर्भातील भूसंपादन प्रक्रिया तसेच इतर अनुषंगिक बाबींची चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी वाटाघाटीद्वारे समितीसमोर ठेवावयाची प्रकरणे, दर निश्चिती, निवाडा पारित झालेल्या प्रकरणांतील कमी-जास्त पत्रके, ताबा घेतलेल्या जमिनींच्या मावेजा वाटपाची स्थिती तसेच प्राधिकरणाकडे पाठवावयाच्या प्रस्तावांचा सविस्तर आढावा घेतला.

भूसंपादन प्रक्रियेमध्ये अनावश्यक विलंब होऊ नये यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच आवश्यक त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त घेऊन भूसंपादनाची प्रक्रिया सुरळीत व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. जिल्ह्यातील विविध पायाभूत सुविधा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया गतीमान करणे अत्यंत आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# रिसाला बाजार रेल्वे उड्डाणपूल, रस्त्याचे काम रखडले, वाहनचालक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ मे**



शहरातील रिसाला बाजार परिसराजवळील रेल्वे उड्डाणपूल आणि रस्त्याचे काम मागील अनेक दिवसांपासून रखडलेले आहे. या अर्धवट आणि संथ गतीने सुरू असलेल्या कामांमुळे स्थानिक नागरिक, शालेय विद्यार्थी आणि वाहनधारकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रशासकीय अनास्था आणि लोकप्रतिनिधींचे या गंभीर समस्येकडे झालेले दुर्लक्ष यावर आता स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

रस्ता खोदलेल्या अवस्थेत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर झालेल्या धुळीच्या साम्राज्यामुळे स्थानिक नागरिकांना दररोजचा त्रास झाला.या अर्धवट कामामुळे रस्ता अरुंद झाला असून, येथे दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने शाळा आणि महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या कोंडीतून आणि धुळीतूनच प्रवास करावा लागत असून रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून लहान-मोठे अपघात रोजचेच झाले आहेत रात्रीच्या वेळी या मार्गावरून प्रवास करणे वाहनधारकांसाठी अत्यंत धोकादायक बनले आहे. या परिसरातील रखडलेल्या कामाबाबत नागरिकांनी वारंवार आवाज उठवला आहे. मात्र, संबंधित विभाग आणि कंत्राटदाराकडून कामाला गती दिली जात नसल्याचे चित्र आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन हा प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# किनवटमध्ये महसूल विभागाचा थरार; मुसळधार पावसात मध्यरात्री 'छापा'

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १५ मे -**

तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीला लगाम घालण्यासाठी महसूल विभागाने शुक्रवारी (दि. १५ मे) पहाटेच्या सुमारास मोठी कारवाई केली. विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाची तमा न बाळगता महसूल पथकाने दोन किलोमीटर पायपीट करून दाभाडी शिवारात वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडला. या धडक कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, मौजे दाभाडी परिसरात रात्रीच्या अंधारात विनापरवाना रेती उपसा आणि वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती प्रशासनाला मिळाली होती. सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीतचंद्र दोंन्तुला आणि तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने एक विशेष पथक तैनात करण्यात आले.

शुक्रवारी रात्री ११:४० च्या सुमारास या मोहिमेला सुरुवात झाली. निसरडा रस्ता आणि कोसळणाऱ्या पावसामुळे वाहने नेणे शक्य नसल्याने, महसूल कर्मचाऱ्यांनी सुमारे दोन किलोमीटरचा रस्ता पायी कापला. पहाटे १:५० वाजण्याच्या सुमारास पथकाने दाभाडी शिवारात सापळा रचून रेतीने भरलेला ट्रॅक्टर (क्रमांक चक २६ उए १२६५) रंगेहात पकडला. हा ट्रॅक्टर मौजे दाभाडी येथील प्रल्हाद लक्ष्मण शिंदे यांच्या मालकीचा असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या मोहिमेत मंडळ अधिकारी (बोधडी बु.) जयराम गाडे, मंडळ अधिकारी (मांडवी) विनोद सिंगेवार, ग्राम महसूल अधिकारी हरीश यादव, मेघश्याम सांगवीकर, सचिन धुमाळे आणि संदीप मडावी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

जप्त केलेला ट्रॅक्टर पहाटे २:३० वाजता किनवट तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करून शासनाचा महसूल बुडवणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ही मोहीम यापुढेही तीव्र केली जाईल, असा इशारा तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी दिला आहे. तसेच, नागरिकांनी अशा अवैध प्रकारांची माहिती प्रशासनाला देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# स्वारातीम विद्यापीठात 'डेव्हलपमेंट स्टडीज' पदविका अभ्यासक्रम सुरू : डॉ. महेश मगर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ मे -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रामार्फत आगामी शैक्षणिक वर्षापासून पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन डेव्हलपमेंट स्टडीज हा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य डॉ. महेश मगर यांनी मागील अधिसभा बैठकीत रूरल डेव्हलपमेंट अथवा डेव्हलपमेंट स्टडीज या विषयांशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रस्ताव मांडला होता. मराठवाड्यातील ग्रामीण, सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रमाची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले होते. अधिसभेमध्ये यावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार, डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रामार्फत हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत असून अभ्यासक्रमाची रूपरेषा, अभ्यासक्रम संरचना तसेच प्रवेश प्रक्रियेची नियमावली अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण यांनी तयार केली आहे. अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अनुषंगाने तयार करण्यात आला असून ग्रामीण विकास, विकास अध्ययन, सार्वजनिक धोरण, कृषी व सामाजिक-आर्थिक प्रश्न, स्थानिक स्वराज्य संस्था आणि क्षेत्रीय अभ्यास यांसारख्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे.

हा अभ्यासक्रम एक वर्ष कालावधीचा असून दोन सत्रांमध्ये विभागलेला आहे. क्षेत्रभेटी, प्रात्यक्षिके, अहवाल लेखन, सादरीकरण आणि संशोधनाभिमुख अध्ययनावर विशेष भर देणे आदी अभ्यासक्रमामध्ये नमूद करण्यात आले आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र सुरू करण्यासाठी अधिसभेत प्रस्ताव मान्य करून घेतला होता. नोंदणीकृत पदवीधर मतदार निवडणुकीच्या जाहीरनामांमध्ये डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र सुरू करणार यांचाही समावेश होतो. माझ्या पहिल्याच अधिसभा सदस्य काळात ते सुरू झाले, याचा मला अभिमान आहे. आता माझ्या दुसऱ्या अधिसभा कार्यकाळात त्याच अध्यासन केंद्र पदविका अभ्यासक्रम सुरू केल्याबद्दल प्रशासनाचे डॉ. महेश मगर यांनी आभार मानले.

## अवैध रेतीचा उपसा करणाऱ्या दोघांना अटक

**नांदेड** - नांदेड ग्रामीण पोलिसांनी काल मध्यरात्री साडेबारा वाजता विष्णूपुरी शिवारात धाड टाकून अवैध रेतीचा उपसा करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३९ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ग्रामीण पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार विष्णूपुरी शिवारात गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा अवैधरित्या होत असल्याचे समजले. त्यानुसार काल रात्री त्यांनी धाड टाकून एक ट्रॅक्टर, पाण्यात तरंगणारे ३२ तराफे, रेती उपसा करणारे चार इंजिन असा ३९ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ज्यात रेतीचाही समावेश आहे. पोलिसांनी ट्रॅक्टर चालक गजानन वानखेडे व त्याचा सहकारी आनंदा गोडबोले यांना अटक केली असून, यातील अन्य दोघेजण मात्र पळून जाण्यात यशस्वी ठरले. त्यांचा तपास व शोध मोहिम सुरु आहे. यात जप्त केलेले ३२ तराफे पोलिसांनी जाळून टाकले आहेत. सचिन चावरे यांच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलीस असल्याची बतावणी करुन फसवणूक

**नांदेड-** नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाकीजा फंक्शन हॉलसमोर आपण पोलीस असल्याची बतावणी करुन एका व्यक्तीच्या जवळील ६५ हजार रुपयांचे दागिणे लंपास केले आहेत. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

दामोदर हनुमानदास जाजू हे काल रात्री आपल्या घरी जात असताना पाकीजा फंक्शन हॉलजवळ दोन इसम त्यांच्याजवळ आले आणि त्यांनी आम्ही पोलीस असून या भागात चोर्या होत आहेत असे सांगून जाजू यांच्या जवळील सोन्याची चैन व अंगठी असा ऐवज एका पिशवीत ठेवला व तेथून ते पिशवी घेवून पसार झाले. त्याची किंमत ६५ हजार रुपये एवढी असून, पोलीस असल्याची बतावणी करुन आपल्याला फसविले अशा आशयाची तक्रार त्यांनी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली. त्यावरुन अज्ञात दोन व्यक्तीविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अर्धापूर-**अर्धापूर शहरातील नामांकित वकील ॲड.शेख आमेर शेख सगीर अर्धापूरकर यांच्या वतीने वॉर्ड क्रमांक ३ तसेच अर्धापूर शहरातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी



विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत विविध क्षेत्रातील करिअर संमधिबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना ॲड.शेख आमेर यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यातील ध्येय डोळ्यासमोर ठेवून शिक्षण घ्यावे,असे आवाहन केले. कायद्याच्या क्षेत्रात करिअर करायचे असल्यास सेट परीक्षा देऊन बीएसएल व एलएल.बी. शिक्षण घेता येते, तर विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन जेईई परीक्षेद्वारे इंजिनिअरिंग तसेच कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये उज्ज्वल करिअर करता येते, असे त्यांनी सांगितले. तसेच डॉक्टर होण्यासाठी नीट परीक्षा उत्तीर्ण होऊन एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस आदी अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो, अशी माहितीही त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. याशिवाय आयटीआयमधून तांत्रिक कौशल्य आत्मसात करून हाताला हुनर मिळवता येतो, तर बीबीए शिक्षणातून उत्तम व्यावसायिक बनण्याची संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकीकडे शिक्षण महाग करून विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र देशाची प्रगती आणि समाजाचे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे व्यक्तिमत्त्व बनावे, असे प्रेरणादायी विचार त्यांनी व्यक्त केले. यावेळी १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी मोठ्या संख्येने ॲड. शेख आमेर यांच्या कार्यालयात उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि महापुरुषांचा इतिहास समजावा यासाठी ॲड. शेख आमेर यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिवाजी कोण होता? हे पुस्तक भेट दिले. तसेच विद्यार्थ्यांचा पुष्पहार घालून सत्कार करून त्यांच्या भावी आयुष्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

## रणजित गोणारकर यांना केळुसकर गुरुजी प्रेरणा पुरस्कार जाहीर

**नांदेड** -येथील सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने दिला जाणारा केळुसकर गुरुजी प्रेरणा पुरस्कार माध्यमिक शिक्षक रणजित गोणारकर यांना जाहीर झाला आहे. गोणारकर यांची शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन गेली पंचवीस वर्षे कार्यरत असलेल्या सत्यशोधक विचारमंचाने त्यांची निवड केली आहे. निवडीचे पत्र मंचाचे अध्यक्ष कोंडदेव हाटकर यांनी दिले. यावेळी सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, संयोजन समितीचे नागोराव डोंगरे यांची उपस्थिती होती. शहरात जून महिन्यात होणाऱ्या २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनात रणजित गोणारकर यांना मान्यवरांच्या हस्ते सदरील पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार असून पुरस्काराचे स्वरूप मानाचा फेटा, शाल, ग्रंथ, मानचिन्ह, सन्मानचिन्ह, गौरवपत्र असे राहणार आहे, असे संयोजन समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे. रणजित गोणारकर हे उमरी तालुक्यातील बळेगाव येथे कृष्णाई माध्यमिक विद्यालयात कार्यरत आहेत. पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठान उमरी व सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# एसजीजीएस संस्थेतील १३६ शास्त्रज्ञांचा एडी सायंटिफिक इंडेक्स मध्ये समावेश

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १५ मे -**

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र महाविद्यालयाने शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेतील १३६ शास्त्रज्ञांचा प्रतिष्ठित एडी सायंटिफिक इंडेक्स एच-इंडेक्स रँकिंग २०२६ (ऊ -डलळशपींळषळल खपवशु -२०२६) मध्ये समावेश झाल्याचा मान मिळविला आहे.



महाराष्ट्रातील एका अभियांत्रिकी संस्थेमधून इतक्या मोठ्या संख्येने शास्त्रज्ञांचा समावेश होणे ही अत्यंत अभिमानाची बाब असून, यामुळे संस्थेची संशोधन क्षेत्रातील भरीव कामगिरी तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक प्रभाव अधोरेखित झाला आहे. या शास्त्रज्ञांच्या यादीत संस्थेचे संचालक डॉ. मनेश ब. कोकरे, डॉ. अनिल गोंडे, डॉ. अभिजित नांदेडकर, डॉ. अरुण पाटील, डॉ. डी. डी. डोये, डॉ. जे. व्हि. मेघा, डॉ. माधव वैद्य, डॉ. मिलिंद भालेराव, डॉ. बी. आर. बोमडे ईत्यादी प्राध्यापकांचा समावेश आहे.

दि. १३ मे २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या या क्रमवारीत संशोधकांचे मूल्यमापन एच-इंडेक्स, सायटेशन्स, आय-१० इंडेक्स तसेच मागील पाच वर्षांतील संशोधन कार्य यांच्या आधारे करण्यात आले आहे. एडी सायंटिफिक इंडेक्समध्ये जगभरातील २२१ देशांतील २६ लाखांहून अधिक शास्त्रज्ञांचा समावेश आहे.

ही यशस्वी कामगिरी संस्थेच्या पुढील बाबींप्रती असलेल्या सातत्यपूर्ण बांधिलकीचे प्रतीक आहे

दर्जेदार संशोधन व नवोपक्रम, नामांकित संशोधन नियतकालिकांमध्ये प्रकाशने,आंतरशाखीय शैक्षणिक सहकार्य, संशोधनाभिमुख शैक्षणिक वातावरणाची निर्मिती.या यशातून संस्थेतील प्राध्यापक व संशोधकांचे ज्ञानवृद्धी, विज्ञान व तंत्रज्ञान विकासासाठीचे योगदान अधोरेखित झाले आहे.

संस्थेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे मा. अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, तसेच सदस्य श्री प्रशांत पोळ, प्रा. विक्रम गद्रे (आयआयटी मुंबई), निखिल मुंडले, संत बाबा सुखविंदर सिंघजी, सौ. राजश्रीताई पाटील, डॉ. डी. डी. डोये आणि डॉ. जे. व्ही. मेघा यांनी या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व १३६ शास्त्रज्ञांचे, प्राध्यापकांचे व संस्थेच्या प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनीही संस्थेच्या संशोधन क्षेत्रातील प्रगतीचे कौतुक करून सर्व मानांकित शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी देखील सर्व मानांकित शास्त्रज्ञांचे अभिनंदन करून संस्थेची संशोधन संस्कृती व शैक्षणिक प्रतिष्ठा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले. भविष्यातही संस्था संशोधन, नवोपक्रम व तांत्रिक शिक्षण क्षेत्रात अधिक मोठी यशे संपादन करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संस्थेतील सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व कर्मचारी यांनीही सर्व मानांकित शास्त्रज्ञांचे अभिनंदन करून संस्थेच्या लौकिकात भर घातल्याबद्दल अभिनंदन केले.

# विवाह सोहळ्यात २५१ संविधान ग्रंथांची भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ मे -**

मौजे बरबडा ता. नायगाव येथे दि. १० मे रोजी केंद्रीय मुख्याध्यापक माधवराव रेडेवाड यांची सुकन्या चि.सौ. कां. मनीषा आणि श्रीमती सुनंदा अशोकराव जेठेवाड यांचे चि. अजिंक्य यांचा विवाह सोहळा अतिशय थाटात पार पडला. बरबडा येथील रेडेवाड व जेठेवाड परिवाराच्या मंगल प्रसंगी आजच्या काळातील दस्ती, टोपी, शाल, हार, तुरे या पारंपारिक पद्धतीला फाटा देत रेडेवाड व जेठेवाड परिवाराने वधू-वरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित पाहुणे मंडळींना अतिशय आदराने कायदेशीररित्या मानवी मूल्यांचे रक्षण करणारा मौलिक ग्रंथ भारतीय संविधान २५१ मान्यवरांना भेट देऊन सन्मान केला.

ज्याअर्थी भारतीय जनतेचे हक्क आणि अधिकार कर्तव्ये प्रदान करणारे भारतीय संविधान प्रत्येकाच्या घरात उपलब्ध असावे, भारतीय जनतेचे सार्वभौमत्व, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय हक्काचे संवर्धन करणारा मौलिक दस्तऐवज प्रत्येकानी अध्ययन करावा, असा सदहेतू मनी धरून रेडेवाड व जेठेवाड परिवाराच्या अभिनव उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते नागनाथराव घिसेवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, माजी जि.प. अध्यक्ष आनंदराव गुंडले, मनोज पाटील मोरे, सौ. शंकुतला भगवान मुदिराज नगराध्यक्ष उमरी, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत भुसेवाड, नगरसेवक लक्ष्मण कंधारकर, बोईनवाड, बालाजी मदेवाड, शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे, शिक्षणाधिकारी मनपा प्रवीणा मांदळे, उपशिक्षणाधिकारी नागराज बनसोडे, शिवाजीराव नाईकवाडे, शिक्षकनेते विठ्ठलराव ताकबिडे, संजय कोठाळे, प्रल्हाद राठोड, व्यंकटराव गंदपवाड, चंद्रकांत गुंगेवाड, वसंतराव कलंबरकर, गिरीधारी मोळके, आनंदा रेजितवाड, मारोती बिचेवार, केरबा जेठेवाड, रोहिदास बस्वदे, जयवंत काळे, मारोती सांगवीकर, शंकर गालेवाड, डॉ. बालाजी आदमपूरकर, डॉ. विठ्ठल मेकेवाड, डॉ. संजय व्यंकटपूरवार, डॉ. रवी सुरेवाड, डॉ. अविनाश बुन्नावार, डॉ. तर्फेवाड, राम मालेवाड, आनंद मनाळकर, हनमंत मामीलवाड, गंगाधर कल्याणकर, दादाराव कोठेवाड, हनमंत उलिगडे आदींची उपस्थिती होती.

# मुदखेड तालुक्यातील दोन गावांची जनगणना स्वगणनेत शंभर टक्के कामगिरी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १५ मे -**

देशभरात सुरू असलेल्या जनगणना-२०२७ प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना स्वगणना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दि. १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या या मोहिमेला नांदेड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मुदखेड तालुक्यातील आमरापुर/दुधनवाडी व बोरगाव सीता या गावांनी शंभर टक्के स्वगणना पूर्ण करून आदर्श निर्माण केला आहे.



या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रशासनाच्या वतीने संबंधित गावांतील नागरिकांचे अभिनंदन करण्यात आले आहे. तालुक्यातील इतर गावांनीही या गावांचा आदर्श घेऊन स्वगणना मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार तथा चार्ज अधिकारी, तालुका मुदखेड आनंद देऊळगावकर यांनी केले आहे.

देशभरात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेसाठी प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना आवश्यक प्रशिक्षणही देण्यात आले आहे. या प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना स्वतःची माहिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमास नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे प्रशासनाने सांगितले.

सदर स्वगणना मोहीम जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी राहुल कर्डीले, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार तथा चार्ज अधिकारी आनंद देऊळगावकर आणि नायब तहसीलदार तथा अतिरिक्त चार्ज अधिकारी मारोतराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

या मोहिमेत पर्यवेक्षक सविता पदमवार, आमरापुर/दुधनवाडी येथील प्रगणक छाया पाटील, बोरगाव सीता येथील प्रगणक ठाकूर (सहशिक्षक) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच फिल्ड ट्रेनर गोविंद शिरुरकर व विद्याधर शेवाळकर, सरपंच नवनाथ कदम, माजी पोलीस पाटील नाईकवाडे, पोलीस पाटील भागवत कोल्हे, ग्राम महसूल अधिकारी गलांडे तसेच जनगणना शाखेतील कर्मचारी उल्हास जवळेकर आणि तांत्रिक सहाय्यक गोविंद शिंदे यांनी सहकार्य केले.

# इस्लापूर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर वाढतोय जनआक्रोश; एकामागून एक कारनामे उघडकीस

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १५ मे -**

किनवट तालुक्यातील इस्लापूर ग्रामपंचायतीतील माहिती अधिकार प्रकरण आता चांगलेच तापले असून, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागविण्यात आलेली माहिती वारंवार आदेश देऊनही उपलब्ध करून न दिल्याने ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात जनआक्रोश वाढत आहे. विशेष म्हणजे, संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वरदहस्त अथवा छत्रछाया असल्यानेच कारवाई होत नसल्याचे आरोप आता गावकऱ्यांमधून उघडपणे केले जात आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अपीलकर्त्याने १ जानेवारी २०२१ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीतील ग्रामपंचायतीअंतर्गत झालेली विकासकामे, वार्षिक अंदाजपत्रके, निधी खर्च, मंजूर कामे तसेच विविध प्रशासकीय कागदपत्रांची माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागविली होती. मात्र नियमानुसार माहिती उपलब्ध करून न दिल्याने अपीलकर्त्याने माहिती अधिकार कायदा २००५ च्या कलम १९(१) अन्वये दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

माहिती अधिकार कायद्यातील कलम ७(१) नुसार अर्जदारास ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असतानाही संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाने माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यानंतर अपीलकर्त्याने दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती किनवट यांच्याकडे प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती किनवट यांनी दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी पत्र निर्गमित करून दिनांक ४ मे २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालयात सुनावणी ठेवली होती.

विशेष म्हणजे, अपीलकर्ते हे सुनावणीसाठी मुंबईहून उपस्थित राहिले; मात्र संबंधित ग्रामपंचायत अधिकारी सुनावणीस गैरहजर राहिल्याचे समोर आले. सुनावणीदरम्यान अपीलकर्त्याने मागणी केलेली कोणतीही माहिती ग्रामपंचायत प्रशासनाने उपलब्ध करून दिलेली नाही, अशी भूमिका मांडली.

सदर प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी जनमाहिती अधिकारी ग्रामपंचायत इस्लापूर यांना माहिती अधिकार अधिनियम २०२६ नुसार मागितलेली संपूर्ण माहिती सात दिवसांच्या आत विनाविलंब व विनाशुल्क उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र आदेशानंतरही अनेक दिवस उलटून गेले तरी माहिती उपलब्ध करण्यात आलेली नसल्याचा आरोप कायम आहे.

दरम्यान, इस्लापूर शहरात गेल्या काही काळात विविध विकासकामे, निधी खर्च, कथित नियमबाह्य कारभार तसेच वेगवेगळे प्रशासकीय कारनामे उघडकीस येत असल्याने ग्रामपंचायत प्रशासनाविषयी संशयाचे वातावरण अधिक गडद होत आहे. माहिती लपविण्यामागे नेमके काय दडले आहे? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

गावकऱ्यांमध्ये आता उघडपणे चर्चा सुरू असून, संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वरदहस्त किंवा छत्रछाया असल्यानेच आदेश असूनही कारवाई होत नाही, असे आरोप करण्यात येत आहेत. सामान्य नागरिकांना नियम दाखवले जातात; मात्र अधिकाऱ्यांसाठी वेगळे नियम आहेत का? असा संतप्त सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

कायद्यातील कलम २० नुसार माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे, माहिती लपविणे अथवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन न करणे ही गंभीर बाब मानली जाते. अशा परिस्थितीत संबंधित जनमाहिती अधिकाऱ्यावर प्रतिदिन २५० रुपयांप्रमाणे कमाल २५ हजार रुपयांपर्यंत दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.

स्थानिक स्तरावर न्याय न मिळाल्याने अखेर अपीलकर्त्यावर छत्रपती संभाजीनगर येथील माहिती आयोगाच्या खंडपीठाचे दार ठोठावण्याची वेळ आल्याचे बोलले जात असून, या संपूर्ण प्रकरणात वरिष्ठ प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेणार याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**माहिती अधिकार कायद्याचा सन्मान राखावा : अमोल पवार**

माहिती अधिकार कायदा हा सामान्य नागरिकांना प्रशासनाकडून पारदर्शकता मिळवून देणारा महत्त्वाचा कायदा आहे. मात्र इस्लापूर ग्रामपंचायतीकडून मागविलेली माहिती वारंवार आदेश देऊनही उपलब्ध करून दिली जात नसल्याने प्रशासनाची भूमिका संशयास्पद वाटत आहे. मी नियमानुसार अर्ज, प्रथम अपील तसेच सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केली. मुंबईहून स्वतः उपस्थित राहूनही संबंधित अधिकारी गैरहजर राहिले, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट आदेश दिल्यानंतरही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे आता या प्रकरणात माहिती आयोगाकडे दाद मागण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. ग्रामपंचायतीतील विकासकामे, निधी खर्च आणि प्रशासकीय व्यवहार पारदर्शक असतील तर माहिती देण्यास टाळाटाळ का केली जाते? असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांनाही पडला आहे.

प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांवर योग्य कारवाई करावी व माहिती अधिकार कायद्याचा सन्मान राखावा, हीच अपेक्षा असल्याचे अमोल पवार म्हणाले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आरापूर शिवारात आयशरची डीजे टेम्पोला जोरदार धडक; दोन ठार, दोन जखमी







लासूर स्टेशन प्रतिनिधी : लासूर स्टेशन जवळील आरापूर शिवारात मुंबई–नागपूर महामार्गावर गुरुवारी पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला. डीजेच्या टेम्पोला भरधाव आयशरने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

शिल्लेगाव पोलीस ठाणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर येथून एका लग्न समारंभासाठी डीजेचा टेम्पो वैजापूरच्या दिशेने जात होता. दरम्यान, आरापूर शिवारात चालकाने लघुशंकेसाठी डीजे टेम्पो (एमएच ०४ एफडी ८१०४) रस्त्याच्या कडेला उभा केला होता. त्याचवेळी शेंद्रा येथून डोंबिवलीकडे मालवाहतूक करणाऱ्या आयशर (एमएच २० ईएल १७७९) वाहनाने टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक दिली.

या धडकेत डीजे टेम्पो रस्त्याच्या कडेला पलटी झाला. अपघातात राहुल दिलीप राठोड (वय २१, रा. कुंभेफळ) आणि गोविंद पुंडलिक तनपुरे (वय ३०, रा. जडगाव, ता. छत्रपती संभाजीनगर) यांचा जागीच मृत्यू झाला. तर दोन जखमींवर उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर आयशर चालक घटनास्थळावरून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच गणेश काळे, धनंजय गोंडे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पुढील तपास धनंजय गोंडे करीत आहेत.

## महाराष्ट्रातील वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज

छत्रपती संभाजीनगर: नागपूरपुरत्या मर्यादित नसून राज्यातील इतर शहरांमध्येही अशाच अडचणी निर्माण होत आहेत.विशेषतः उन्हाळ्यात वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना वाढत आहेत.या समस्या पुणे किंवा नागपूरपुरत्या मर्यादित नसून राज्यातील इतर शहरांमध्येही अशाच अडचणी निर्माण होत आहेत. समता पॉवरचे संचालक डी.डी. अग्रवाल यांनी सांगितले की, केवळ तात्पुरती दुरुस्ती करून ही समस्या सुटणार नाही. अलीकडील मीडिया अहवालांनुसार राजस्थानमधील बीकानेर, सीकर, झुंझुनू, हनुमानगड, बाडमेर आणि जैसलमेर या भागांमध्ये जोरदार वाऱ्यांमुळे आणि पावसामुळे वीजेचे खांब आणि ट्रान्सफॉर्मरचे नुकसान झाले. यामुळे अनेक ग्रामीण भागांमध्ये दीर्घकाळ वीज पुरवठा खंडित राहिला. काही ठिकाणी तर अनेक दिवस वीज नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.अशा समस्या टाळण्यासाठी वीज कंपन्यांनी आधुनिक पायाभूत सुविधा उभारणे गरजेचे आहे. त्यासाठी जास्त क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर आणि आधुनिक केबलिंग प्रणालीमध्ये गुंतवणूक करावी. वाढलेला वीज भार सहन करू शकणारी आणि जास्त उष्णता निर्माण न होणारी टिकाऊ आणि उच्च विद्युत वहनक्षम सामग्रीचा वापर केल्यास वीज यंत्रणेत बिघाड, अपघात आणि नुकसान कमी होऊन वीजपुरवठा अधिक विश्वासार्ह होऊ शकतो.

## हॉटेल उद्योगात मनुष्यबळाची तीव्र कमतरता

छत्रपती संभाजीनगर: भारतातील हॉस्पिटॅलिटी (आतिथ्य) क्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना, हॉटेल उद्योगाला प्रवेश-स्तरीय प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत आहे. भरतीतील तूट, उच्च ॲट्रिशन (कामगार गळती) आणि तात्काळ कामासाठी तयार उमेदवारांची गरज लक्षात घेता, 'डायरेक्ट प्लेसमेंट' आधारित हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमा पाथवे हा प्रभावी आणि व्यावहारिक पर्याय म्हणून पुढे येत आहे. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात केवळ व्यवस्थापक किंवा वरिष्ठ तज्ज्ञांचीच नव्हे, तर शिस्तबद्ध, सेवा-केंद्रित आणि ऑपरेशन्सशी पटकन जुळवून घेणाऱ्या प्रवेश-स्तरीय कर्मचाऱ्यांची मोठी गरज असते. विविध बाजारपेठांमध्ये कुशल-अकुशल श्रेणीत 30 ते 40 टक्क्यांपर्यंत मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याने उद्योग असंघटित भरतीऐवजी संरचित वर्कफोर्स पाइपलाइनकडे वेगाने वळत आहे.

## संतूर लाईमची नवीन टीव्ही जाहिरात लाँच

छत्रपती संभाजीनगर: विप्रो कंझ्युमर केअर ॲंड लाइटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने संतूर लाइम साबणासाठी नवीन टीव्ही जाहिरात लाँच केली आहे. ही जाहिरात आजच्या व्यस्त दिनचर्येत दररोज स्वतःला पुन्हा ताजेतवाने आणि रिचार्ज करण्याच्या कल्पनेवर आधारित आहे."3x फ्रेशनेस" या आश्वासनासह हा साबण प्रत्येक वापरानंतर दीर्घकाळ ताजेपणाची अनुभूती देतो. संतूर लाइम साबणामध्ये लिंबू, एलोवेरा आणि मेंथॉल यांचे मिश्रण आहे, ज्यामुळे थंडावा देणारा आणि ताजेतवाना करणारा आंघोळीचा अनुभव मिळतो. टिल्ट ब्रँड सोल्युशन्सने संकल्पित केलेली ही टीव्ही जाहिरात एका शिक्षिकेची कथा दाखवते, जी एक आईसुद्धा आहे. ती शाळा आणि घर या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळते. दिवसभराच्या धावपळीत ती थकलेली दिसते, तिच्यावरचा ताण जाणवू लागतो, पण थोडी विश्रांती मिळाल्यानंतर तिचा मूड बदलतो. त्यानंतर संतूर लाइम साबणाने आंघोळ केल्यानंतर ती पूर्णपणे "100% रिचार्ज" झाल्यासारखी ताजेतवानी होते आणि पुन्हा उत्साहाने आपले काम पुढे सुरू करते.

## उद्योजकांसाठी 'बिझनेस मल्टिप्लायर' क्रेडिट कार्ड लॉन्च केले

मुंबई : आयडीएफसी फर्स्ट बँकेने संस्थापक, उद्योजक आणि व्यवसाय मालकांसाठी एफडी-समर्थित बिझनेस मल्टिप्लायर मेटल क्रेडिट कार्ड सादर केले आहे. दैनंदिन व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेल्या या प्रीमियम मेटल कार्डवर व्यवसायाचे नाव आणि कार्डधारकाचे नाव दोन्ही प्रिंट केले जातात, जे त्याच्या व्यावसायिक वापराची पुष्टी करते. व्यावसायिक खर्चासाठी स्वतंत्र क्रेडिट मर्यादेसह, बिझनेस मल्टिप्लायर क्रेडिट कार्ड व्यावसायिक आणि वैयक्तिक खर्च वेगळे ठेवण्यास मदत करू शकते.फिक्स्ड डिपॉझिटशी संलग्न खात्रीशीर क्रेडिट लिमिट, महत्त्वाच्या व्यावसायिक खर्च श्रेणींवर आकर्षक रिवॉर्ड्स, खर्चाचे रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर शून्य फॉरेक्स मार्कअप यांसारख्या सुविधांसह हे कार्ड व्यवसायांना कॅश फ्लो अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यास, खर्चांवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्यास आणि कालांतराने मजबूत क्रेडिट प्रोफाइल तयार करण्यास मदत करते.

## फिनिक्स मार्केटसिटी मुंबईमध्ये कँडी सफारी

मुंबई, ६ मे २०२६: फिनिक्स मार्केटसिटी मुंबई म्हणजे शॉपिंग, डायनिंग आणि मनोरंजनासाठीचे शहरातील एक अप्रतिम ठिकाण! इथे यंदाच्या उन्हाळ्यातील खास कँडी सफारी या उपक्रमाला सुरुवात झाली आहे. या गोड नव्या जगात प्रवेश करा आणि एक अद्भूत, 'लार्जर दॅन लाईफ' असा अनुभव घ्या... जिथे कँडीने सजलेल्या जगात तुम्हाला जादुई अनुभव घेता येईल. मागील वर्षीच्या कँडी सिटीच्या यशाच्या पार्श्वभूमीवर यंदा सादर करण्यात आलेल्या उपक्रमात नवीकोरी सफारी थीम वापरण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण मॉलला उत्साही, सफारीची प्रेरणा असलेल्या जगाचं रूप देण्यात आलं आहे. कुटुंब, मुले, क्रीएटर्स अशा सर्वांचाच यात विचार करण्यात आला आहे. मुलांना प्राधान्य देणारा आणि सर्व कुटुंबाला आवडेल असा अनुभव देणाऱ्या कँडी सफारीमुळे उन्हाळ्याची सुट्टी एक आकर्षक, उत्कृष्ट दृश्यात्मक मुल्ये असलेला अनुभव ठरणार आहे.

### आ प्रशांत बंब यांच्या प्रयत्नाने खुलताबाद नगर परिषदेसाठी

## गिरजा मध्य प्रकल्प येसगाव येथील पाणी आरक्षण करारनाम्यामुळे मोठा दिलासा

तभा वृत्तसेवा

**खुलताबाद** | गिरजा मध्य प्रकल्प येसगाव येथील नगरपरिषदेसाठी पाणी आरक्षण करारनामा मंजूर झाल्यामुळे खुलताबाद शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला मोठा दिलासा आमदार प्रशांत बंब यांच्या प्रयत्नातून मिळाला असून भविष्यातील जलसुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय मानला जात आहे.

यापूर्वी पाणी आरक्षण करारनामा नसल्यामुळे पाटबंधारे विभागाकडून खुलताबाद नगरपरिषदेकडून दंडनीय आकारणी करण्यात येत होती. कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा विभागा चे अभियंता श्रीहरी चौडेकर यांनी केलेल्या पत्र व्यवहारामुळे आज रोजी पाणी करारनामा मंजूर झाला आहे

नगर परिषदेवर आर्थिक



खर्चाचा बोजा निर्माण होत होता. मात्र सद्यस्थितीत १ मे २०२६ ते ३० एप्रिल २०३२ पर्यंत पाणी आरक्षण करारनामा मंजूर झाल्यामुळे सुमारे ७५ लक्ष रुपयांची बचत खुलताबाद नगर परिषद पाणीपुरवठा विभागाची बचत होण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून प्राप्त झाली

गिरणा मध्यम प्रकल्पातून खुलताबाद नगरपरिषदेसाठी १.४१ दल घमी पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले असून सुधारित

### पाणी आरक्षण करारनामा मंजूर झाल्यामुळे आता

पाणीपुरवठा व्यवस्थेचे दीर्घकालीन नियोजन शक्य होणार, भविष्यातील जलयोजना प्रस्तावांना बळ मिळणार, दुष्काळी परिस्थितीत प्रशासनाला अधिकृत आधार उपलब्ध होणार, तसेच नागरिकांना अधिक नियमित व शाश्वत पाणीपुरवठा देणे शक्य होणार आहे. खुलताबाद शहर हे ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे असल्यामुळे पाणीपुरवठ्याची शाश्वत व्यवस्था ही शहर विकासासाठी अत्यंत आवश्यक बाब मानली जाते. सदर करारनाम्यामुळे भविष्यातील नागरी विकास, पर्यटनवाढ, तसेच मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यास मदत होणार आहे

करारनामा ०१/०५/२०२६ ते ३०/०४/२०३२ या कालावधी साठी लागू राहणार आहे. यामुळे नगरपरिषदेला अधिकृत व कायदेशीर खुलताबाद शहराला नगरपरिषदेकडून होणारा पाणीपुरवठा विभागाला पाणी वापराचा कायदेशीर अधिकार प्राप्त झाला आहे.

सदर पाणी आरक्षण करारनामा मंजुरीसाठी . आ प्रशांत बंब यांनी पाठपुरावा करून. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पाटबंधारे विभागाकडून करारनामा मंजुरीची प्रक्रिया गतीमान झाली व अखेर मंजुरी प्राप्त झाली

मागील काही वर्षांपासून खुलताबाद नगरपरिषदेकडून पाटबंधारे विभागाशी सातत्याने पत्रव्यवहार सुरू होता. विविध स्तरावर पाठपुरावा करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. तथापि, अलीकडील समन्वय, प्रशासकीय प्रयत्न आणि पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण विषय मार्गी लागला आहे

## प्रशासनाच्या कारवाईने शेतरस्ते खुले; ३५ शेतकऱ्यांना दिलासा

तभा वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१४ मे** | तालुक्यातील विविध गावांमध्ये अनेक वर्षांपासून बंद असलेले शेतरस्ते महसूल प्रशासनाच्या पुढाकाराने मोकळे करण्यात आले.तहसीलदार मनिषा मेने यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

तहसील कार्यालय, सोयगाव येथे मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ च्या कलम ५ नुसार प्राप्त आदेशानुसार जरंडी येथील गट क्रमांक १२३ मधील खातेदार अमरसिंग हिरालाल परदेशी यांचा दोन ते तीन वर्षांपासून अडविण्यात आलेला रस्ता मोकळा करण्यात आला.

तसेच सोयगाव येथील गोपाल चौधरी व त्र्यंबक चौधरी यांच्या मालकीच्या गट क्रमांक ४० मध्ये जाण्यासाठीचा रस्ता खुला करण्यात आला. वेताळवाडी येथील गट क्रमांक ४३ मधील देविदास विष्णू सोनवणे व सिद्धार्थ विष्णू सोनवणे यांच्या शेतात जाण्याचा मार्गही मोकळा करण्यात आला. यानंतर धनवट येथील गट क्रमांक ७३/अ मुलचंद झिपरू जाधव यांच्या शेतात जाणारा दोन वर्षांपासून



सोयगाव तहसील प्रशासनाच्या कारवाईत जरंडी, वेताळवाडी, सोयगाव व धनवट परिसरातील अनेक वर्षांपासून बंद असलेले शेतरस्ते मोकळे करण्यात आले.

बंद असलेला रस्ता प्रशासनाने खुला केला.

या कारवाईमुळे परिसरातील सुमारे ३० ते ३५ शेतकऱ्यांना थेट लाभ होणार असून शेतीकामासाठीचा मार्ग सुकर झाला आहे. कारवाईदरम्यान नायब तहसीलदार संभाजी देशमुख, मंडळ अधिकारी अरुण पंडीत, मंडळ अधिकारी कल्पना डिघोळे, ग्राम महसूल अधिकारी वैभव जाधव, संतोष राऊत, शिल्पा बोपटे, भगवान सोळुंके तसेच महसूल सेवक संभाजी बोरसे उपस्थित होते.

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ७०० ग्रॅम वजनाच्या प्री-मॅच्युअर बाळाची आजारावर मात

छत्रपती संभाजीनगर : मेडिकव्हर हॉस्पिटल येथे अवघ्या २५ आठवड्यांत जन्मलेल्या आणि केवळ ७०० ग्रॅम वजनाच्या प्री-मॅच्युअर बाळाने तब्बल तीन महिन्यांच्या अतिदक्षता विभागातील उपचारानंतर जीवनाची लढाई यशस्वीपणे जिंकली आहे. अत्यंत गंभीर परिस्थितीत जन्मलेल्या या बाळाच्या उपचारासाठी डॉ राहुल गोसावी व टीमने अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानासह विविध प्रकारच्या औषधांचा वापर करत सातत्याने प्रयत्न केले.

जन्मानंतर बाळाची प्रकृती अत्यंत नाजूक होती. कमी वजन, अपूर्ण वाढलेले अवयव आणि वारंवार होणारे संसर्ग यामुळे बाळाला अनेक वेळा गंभीर परिस्थितीचा सामना करावा लागला. मात्र नवजात




शिशु अतिदक्षता विभागातील (NICU) तज्ज्ञ डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेत बाळावर योग्य उपचार केले.

उपचारादरम्यान बाळाला विविध प्रकारच्या इन्फेक्शनचा सामना करावा लागला. प्रत्येक वेळी डॉक्टरांनी तत्परतेने उपचार करत संसर्गावर नियंत्रण मिळवले. श्वसन सहाय्य, विशेष पोषण व्यवस्था, संसर्ग नियंत्रण आणि सतत निरीक्षण यामुळे बाळाच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत गेली.

या कठीण काळात बाळाच्या कुटुंबीयांनीही मोठा धीर दाखवत परिस्थितीला सामोरे गेले. डॉक्टरांवर विश्वास ठेवून त्यांनी उपचार प्रक्रियेत पूर्ण सहकार्य केले. कुटुंबीयांच्या सकारात्मकतेमुळे आणि वैद्यकीय टीमच्या अथक प्रयत्नांमुळे अखेर बाळाने प्रकृतीत सुधारणा करत नवजीवन मिळवले.

यावेळी सेंटर हेड डॉ विशाल कुटे यांनी सांगितले की, "अत्यंत कमी वजनाच्या आणि प्री-मॅच्युअर बाळांवर उपचार करणे हे मोठे आव्हान असते. मात्र योग्य वेळी उपचार, आधुनिक सुविधा आणि तज्ज्ञ डॉ राहुल गोसावी यांच्या प्रयत्नांमुळे अशा बाळांना नवजीवन देणे शक्य होत आहे."

सध्या बाळाची प्रकृती स्थिर असून पुढील वाढ आणि आरोग्यासाठी डॉक्टरांकडून नियमित मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## जलकुंभांच्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने करा : जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (विमाका) : शहराला १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने शहरातील विद्यमान तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या जलकुंभांमधून पाणी सोडण्यासाठी आवश्यक असलेल्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले. विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनिषा पलांडे, जीव्हीपीआर कंपनीचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर शहराला नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १२



जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा सुरू करण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जीव्हीपीआर कंपनीला दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर या बैठकीत विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, न्यायालयाच्या निर्देशानुसार पाणीपुरवठा वेळेत सुरू करण्यासाठी विविध तांत्रिक कामे, पंपांची चाचणी तसेच जलकुंभांशी संबंधित किरकोळ कामे वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ घेऊन कामांना गती द्यावी. शहरातील सर्व जलकुंभांची अपूर्ण कामे पूर्ण करून सर्व ठिकाणच्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

या सर्व कामांवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दररोज देखरेख ठेवावी, तसेच महानगरपालिकेने शहरातील प्रत्येक घरापर्यंत नळजोडणी पोहोचविण्यासाठी स्थानिक नगरसेवकांसोबत समन्वय बैठक घेऊन नियोजन करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. नक्षत्रवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी घेणे, जॅकवेलची कामे, जलवाहिन्यांची स्वच्छता, स्कॉर व्हॉल्व्ह व बटरफ्लाय व्हॉल्व्हची दुरुस्ती व तपासणी, पाण्याच्या शुद्धतेची चाचणी तसेच इतर अंतर्गत व किरकोळ कामे पूर्ण झाल्यानंतरच संपूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा सुरू करता येणार असल्याचेही बैठकीत नमूद करण्यात आले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जीव्हीपीआर कंपनी आणि महानगरपालिका यांनी परस्पर समन्वय साधून सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत, अशी सूचना विभागीय आयुक्तांनी केली. तसेच, ज्या ठिकाणी कंत्राटदार काम वेळेत पूर्ण करत नसतील किंवा काम करण्यास टाळाटाळ करत असतील, त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## सोयगाव; राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार 2026 ने प्रा.डॉ.पंकज शिंदे गौरविले



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१५ मे** | येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील भूगोल विषयाचे सहयोगी प्राध्यापक प्रा.डॉ.पंकज युवराज शिंदे यांना महाराष्ट्र शिक्षक पॅनल (एमएसपी) आयोजित भव्य राज्यस्तरीय सोहळ्यात "आदर्श शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार २०२६" प्रदान करून गौरविण्यात आले.हा पुरस्कार दि.१२ मंगळवार रोजी शिर्डी येथे आयोजित समारंभात मराठी चित्रपट अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांच्या हस्ते तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य,विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धती,सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांतील सक्रिय सहभाग तसेच भूगोल विषयातील सातत्यपूर्ण शैक्षणिक योगदान याची दखल घेऊन प्रा. डॉ.शिंदे यांना या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास प्रसिद्ध कवयित्री व संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी गुंजन पाटील, कवी रोहित शिंगे,महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे अध्यक्ष दीपक चामे,सचिव सतीश कोळी तसेच राज्य समन्वयक राजश्री पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.डॉ.पंकज शिंदे यांच्या या यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,कार्यालय अधीक्षक पंकज साबळे,कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## 'गंगा माई की बेटियाँ'मध्ये सिद्धूचा निःस्वार्थ त्याग

छत्रपती संभाजीनगर : गंगा माई की बेटियाँ या मालिकेत सध्या भावनिक आणि नाट्यमय घडामोडींनी प्रेक्षकांची उत्सुकता वाढवली आहे. मालिकेत शिझान खान (सिद्धू) आणि अमनदीप सिधू (स्नेहा) यांच्या कथेला नवे वळण मिळाले आहे. आगामी भागात इंदू राणी स्नेहा आणि सिद्धूला एका खोलीत बंद करून स्नेहाची बदनामी करण्याचा कट रचते. मात्र सिद्धू स्वतःचे प्रेम बाजूला ठेवत स्नेहाच्या सन्मानासाठी शांतपणे स्वतःला लपवतो.



या प्रसंगाबाबत शिझान खान म्हणाला की, सिद्धूचे प्रेम हे हक्क गाजवणारे नसून आदर, मर्यादा आणि निःस्वार्थीपणावर आधारित आहे. स्नेहाला परत मिळवण्याची संधी असूनही तिच्या सन्मानाला प्राधान्य देणे, हाच सिद्धूच्या व्यक्तिरेखेचा मोठेपणा असल्याचे त्याने सांगितले. स्नेहा आणि शंतनूच्या लग्नाची तारीख जवळ येत असताना आता प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे की हे लग्न पार पडेल की सिद्धू-स्नेहाच्या नात्याला नवे वळण मिळेल. 'गंगा माई की बेटियाँ' दररोज रात्री ९ वाजता झी टीव्ही वर पाहता येईल.

## शाश्वत तीर्थ सम्मेद शिखरजी 20 पंथी कोठी महामंत्री पदी संजय पापडीवाल यांची नियुक्ती



छत्रपती सभाजीनगर : दिगंबर जैन समाजाच्या अत्यंत प्राचीन एवं प्रतिष्ठेच्या श्री दिगंबर जैन बीसपंथी उपरैली कोठी मधुबन (झारखंड) या संस्थेवर 108 फूट भगवान ऋषभदेव मूर्ती निर्माण अमेठी मांगीतुंगी चे महामंत्री व भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री संजय पापडीवाल छत्रपती सभाजीनगर पैठन याची यांची महामंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दिगंबर जैन समाजाचे सर्वात मोठे तीर्थ शाश्वत भूमी श्री सम्मेद शिखरजी झारखंड येथील अत्यंत महत्त्वाची व प्राचीन संस्थे वर छत्रपती संभाजीनगरचे संजय पापडीवाल यांची महामंत्री नियुक्ती करण्यात आली आहे. याआधी तेथे ते विश्वस्त म्हणून काम पाहत होते.

श्री अरविंद रावजी दोशी महामंत्री यांनी राजीनामा दिल्यानंतर लोकशाही पद्धतीने सर्वानुमते श्री संजय पापडीवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय पापडीवाल यांनी या आधी जगातील सर्वात भव्य 108 फूट भगवान ऋषभदेव मूर्ती मांगीतुंगी ला निर्माण करण्यामध्ये व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पंचकल्याणक मध्ये कार्य मोलाचे केले आहे. त्यांनी गजपंथा, शिर्डी, धर्मतीर्थ,शिखरजी,हस्तिनापुर, अयोध्या, कुंडलपुर देवगाव,आधी ठिकाणी विविध पदावर काम केलेले असून त्यांच्या या कामाचा अनुभवाचा फायदा त्यांना निश्चित होईल.

जा.क्र/धउआ/नोटरी 2163/२०२६,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बाबा पेट्रोल पंपच्या शेजारी,
अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर
दिनांक : 05 MAY 2026

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर,

**चौकशीची जाहीर नोटीस**

(नमुना क्रमांक. २)

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० याचे कलम-किरकोळ अन्वये) सन २०२५ चा अर्ज क्रमांक १०२७/२०२५ कलम-किरकोळ

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था: ब्लूम विले फाउंडेशन, औरंगाबाद, नोंदणी क्र. एफ-२३५६६(औ.)

अर्जदार :- शेख शमीम अहमद, रा. प्लॉट नं.१७७, हमीदा अहमद व्हिला, आरीफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर,

गैरअर्जदार :- ०३. खतीब फहाद उमेर रियाझुद्दीन, रा. सि-४०४, व्हाईट टॉवर, फेअर डील आर डी, ऑफ एस व्ही रोड, जोगेश्वरी, मुंबई.

०६. शेख तराना अल्ताफ, रा.सि-४०४, व्हाईट टॉवर, फेअर डील आर डी, ऑफ एस व्ही रोड, जोगेश्वरी, मुंबई.

ज्या अर्थी मा.धर्मादाय उप आयुक्त, छ. संभाजीनगर विभाग छ. संभाजीनगर यांच्या कडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात वरील क-किरकोळ अर्जान्वये कलम २२ प्रमाणे नोंदी दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार यांना चौकशीची जाहीर नोटिस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत वरील बार्बीचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे. आज दि.०५/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय उप आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

जा.क्र/धउआ नोटीस/2164 /२०२६,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बाबा पेट्रोल पंपच्या शेजारी,
अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर
दिनांक : 05 MAY 2026

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर,

**चौकशीची जाहीर नोटीस**

(नमुना क्रमांक. २)

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० याचे कलम-किरकोळ अन्वये) सन २०२५ चा अर्ज क्रमांक १०२८/२०२५ कलम- किरकोळ

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था :- ब्लुम विले फाउंडेशन, औरंगाबाद, उ नोंदणी क्र. एफ-२३५६६ (औ.)

अर्जदार :- शेख शमीम अहमद, रा. प्लॉट नं. १७७, हमीदा अहमद व्हिला, आरीफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर.

गैरअर्जदार :- ०२. खतीब रेहाना रियाझुधीन,रा. सि-४०४, व्हाईट टॉवर, फेअर डील आर डी, ऑफ एस व्ही रोड, जोगेश्वरी, मुंबई.

ज्या अर्थी मा.धर्मादाय उप आयुक्त, छ. संभाजीनगर विभाग छ. संभाजीनगर यांच्या कडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात वरील क-किरकोळ अर्जान्वये कलम २२ प्रमाणे नोंदी दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार यांना चौकशीची जाहीर नोटिस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे. आज दि.०५/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय उप आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर